# गोधडी

सुरेश पंदारे



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# गोधडी

कथासंग्रह

लेखक

## सुरेश देवराम पंदारे

# गोधडी

## लेखक... सुरेश देवराम पंदारे

पत्ता: लक्ष्मीगंगा रेसिडेन्सी, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
मोबाईल नं. : ९३७२१९९१००

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २६ ऑगस्ट २०२१**



©esahity Pratishthan®202१

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

## सुरेश देवराम पंदारे



**हुद्दा**:चिफ मॅनेजर, बॅंक ऑफ बडोदा, २०१० ला सेवानिवृत्त

**आवड**:अध्यात्म, वाचन, लेखन, सामाजिक कार्य, ज्ञानेश्वरीवर प्रवचने तसेच एकनाथी भागवत, हरीपाठ आणि नामदेवमहाराजकृत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवरील अभंगाचे निरूपण. – दत्त मंदिरातील भजनी मंडळात सक्रिय.

– Reiki च्या तीनही डिग्री.

– आर्ट ऑफ लिव्हिंगचे कोर्स पूर्ण.

– सुगम संगीताची पहिली परीक्षा जानेवारी २०२१ मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

– संगीतोपचार (Music Therapy) चा ४ महिन्याचा कोर्स पूर्ण केला व Certificate मिळाले.

– SSY चा ७ दिवसांचा कोर्स व नंतर AMC पूर्ण व एक Scope camp पण केला.

– SSY अंतर्गत DYL (Design Your Life) हा १० महिन्याचा कोर्स पूर्ण केला.

# मनोगत

यापूर्वी ई-साहित्यने ‘शिदोरी’ हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. त्यामुळे मला प्रेरणा मिळाली व प्रोत्साहन मिळाले. मनातले लिहावे असे वाटू लागले. माझा हा कथासंग्रह मला भेटलेल्या व्यक्ती व घडलेले प्रसंग यावर आहे. यावर कल्पनेचे कोंदण खूप क्वचित आहे. आहे ते वास्तविक, कधीकधी उघडे-रूप, कधी कधी वाटते या कथेतून मीच मला शोधतो. माझा हा शोध असाच चालू रहावा.

मला या कामी मदत करणाऱ्या श्री. निखिल वडुसकरने अतिशय मनापासून हे सुंदररित्या वेळेवर टाईप करून दिले. त्याचे याप्रसंगी मनापासून आभार.

माझे मित्र श्री. भालचंद्र कोद्रे यांनी याला मनापासून दाद दिली हे पाहून आनंद वाटला.

३-४ वर्षांपासून एक नकळत स्नेहपूर्ण नाते निर्माण झालेल्या सुप्रसिद्ध लेखिका व परीक्षक नंदा सुर्वे यांनी दिलेला अभिप्रायात्मक आशीर्वाद हा माझ्यासाठी अमूल्य ठेवा आहे. त्यांचा मी ऋणी आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा त्यांच्या कार्याचा अनुभव मला असाच प्रेरित करो व सुंदर साहित्य निर्मिती करायला मला बळ देवो हीच अपेक्षा!

माझे मित्र श्री. विलास पायगुडे यांनी पण पुस्तक रूपाने नरवीर प्रकाशनातर्फे लवकरच प्रकाशन करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

ई साहित्याचे मनापासून धन्यवाद! लहान बालकाचे बोट धरून चालायला शिकवावे असे त्यांचे प्रोत्साहन. श्री. सुनील सामंत व सर्व टीमचे पुन:श्च आभार!

माझ्या ७१ व्या जन्मदिनानिमित्त हे मनोगत लिहिताना मनस्वी आनंद होत आहे.

हे पुस्तक माझे आई-वडील व आमचे दोन्ही दादांच्या स्मृतीस अभिवादन करुन अर्पण!

- श्री. सुरेश पंदारे

# प्रस्तावना

कथालेखनाचे विविध प्रकार कथालेखकांकडून हाताळले जातात. अनुभवसिद्ध लेखणीमधून उतरलेल्या कथा वास्तववादीपणाला स्पर्श करून जातात. अशा कथा हृदयस्पर्शी होतात, कधी मेंदूला वेगळी चालना देऊन जातात. त्यामुळे त्या वेगवेगळ्या कोनातून आयुष्याकडे बघण्याची प्रेरणा देतात.

सुरेश पंदारे यांचा ‘गोधडी’ हा कथासंग्रह वाचकांसाठी सिद्ध झालेला आहे. यामधील कथा अशाच आत्मस्पर्शी भावनेतून आलेल्या आहेत. आपल्या कार्यालयीन अनुभवांवर आधारित असल्याने या कथा अधिक भावगर्भ झालेल्या आहेत. खूप संवेदनशीलपणे त्या लेखनबद्ध केलेल्या आहेत. देवकर आजींवरची ‘शिदोरी देवकर आजी’ ही कथा अत्यंत ओलसर मायेची शिंपण लेखकाच्या आयुष्यावर करून जाते. लेखक सुरुवातीच्या काळात सावरगाव नावाच्या छोटया गावात शिक्षक म्हणून नोकरी करत होते, त्यावेळी गावातल्या देवकर आजींकडे जेवणासाठी जात होते. आजी मातीच्या चुलीवर भाजी भाकरी प्रेमाने खाऊ घालत. त्यातून त्यांच्या कुटुंबाशी त्यांची प्रेमाची नाळ जोडली गेली. ते कुटुंबातला एक घटकच होऊन गेले. तो स्मृतीगंध

हा या लेखाचा गाभा आहे. कार्यालयीन कामानिमित्त भेट झाल्यानंतर ती पुढे मैत्रीत रूपांतरित होते. पुढे हे ऋणानुबंध खोल रुजून जातात. त्या मित्राचे चुकून घसरलेले पाऊल सावरायचा प्रयत्न लेखकाकडून होतो; पण ते सावरले न गेल्यामुळे होणारी शोकांतिका 'कळत-नकळत' या कथेमध्ये दिसते. ऐन उमेदीतल्या, यशस्वी वाटचाल करणाऱ्या व्यक्तीची शोकांतिका मनाचा तळ हलवून सोडते.

निसर्ग कसा होत्याचं नव्हतं करतो आणि त्याचे परिणाम किती खोलवर झालेले दिसतात, याचे चित्रण 'शंभराची नोट' या कथेत दिसतं. उत्कर्षाकडून अपकर्षाकडचा माणसाचा प्रवास माणसाला अंतर्बाह्य ढवळून टाकतो. या रखरखीत वास्तवाला सामोरं जावंच लागतं, हे कटू सत्य ही कथा सांगून जाते.

देवीच्या उत्सवात आपलं छोटं मूल हरवतं आणि ते देवीच्या कृपेनेच सापडतं ही श्रद्धेची बळकटी वाढवणारी कथा म्हणजे 'सप्तशृंगी देवीची कथा'. सुरुवातीपासूनच ही कथा पकड घेत जाते. मूल हरवल्यानंतर ते पुन्हा सापडेपर्यंतची बाप म्हणून होणारी अस्वस्थता, घालमेल काळजाला हात घालून जाते. मूल सापडल्यानंतरचा नि:श्वास, नि:शब्द करणारा.

'रक्षाबंधन' ही कथा भावुकतेनं लिहिलेली आहे. बहिण-भावाच्या नात्यातले हळवे भावबंध घेऊन येताना रक्षाबंधनाच्या दिवशी भावाच्या हातावर राखी असणं आणि नसणं या दोन टोकाच्या भावना आहेत. हातावर राखी बांधली गेल्यानंतर भरून निघालेली पोकळी लेखकाने चांगली शब्दबद्ध केली आहे.

सहजपणे जाताजाता एखाद्याचं आयुष्यभराचं कल्याण करणं हा भल्या माणसाचा स्थायीभाव असतो. 'चंद्रभागेची जिद्द' या कथेत हा विषय लेखकाने सशक्तपणे मांडला आहे. आयुष्यातील गरजांचं आभाळ भरल्याने कृतज्ञ होऊन अनेक वर्षांनी सामोरे आलेल्या चंद्रभागेला पाहून लेखक जुन्या आठवणींमध्ये रमतो. त्याचा हा गर्दगहिरा आविष्कार.

एकंदरीत या कथांना सूक्ष्मतेनं अनुभूती टिपण्याचं आणि त्याचबरोबर चिंतनशीलतेचं परिमाण लाभलेलं आहे. आणखी थोडी प्रगल्भता आणि रचनाकौशल्य आलं असतं तर कथांना चांगलं वाङ्मयमूल्य लाभलं असतं. तरीही त्या वाचनीयता वाढवतात, विचारांच्या कक्षा रुंद करतात ही या कथांची जमेची बाजू आहे.

- नंदा सुर्वे

# अनुक्रमणिका


शंभराची  नोट

अडाणी शेतकऱ्याची गोधडी

रक्षाबंधन

‘शिदोरी देवकर आजी’ ची

सप्तश्रृंगी देवीची कृपा

‘‘मी हरलो - तो जिंकला’’

कळत-नकळत

एका जप्तीची अशी ही गोष्ट

चंद्रभागेची जिद्द

आप्पा व ताई

आमचे दादा

# शंभराची नोट

आज या घटनेची आठवण होण्याचे कारण म्हणजे पासपोर्ट रु.२००/- द्यावे लागतील हे एकाने सांगितले. तसे मी भाडे करार नोंदताना पोलिस ऑफिसमध्ये ४-५ वर्षांपूर्वी रु.२००/- वरचेवर दिल्याचे आठवते. आपल्याला हे इतके अंगवळणी पडले की हा जणू आपल्या सरकारी कामाचा अविभाज्य भाग झाला आहे.

त्यामुळेच आज मला सप्टेंबर १९७३ सालच्या बाबतीत घडलेल्या गोष्टीची आठवण झाली.

मी नोव्हेंबर १९७२ ला बॅंकेत नोकरीला लागलो होतो. खरे म्हणजे माझा रितसर विभाग कृषि कर्ज होता. पण पहिले १-२ महिने मी फक्त ट्रान्सफर स्क्रोल व रोज येणाऱ्या शेकडो मेल ट्रान्सफर याची नोंद करत होतो. त्यातच डिसेंबर १९७२ ला मला सेंधवा मध्य प्रदेशात एका मारवाडी व्यापाऱ्याचे कापसाचे गोडावून होते तिथे मी बॅचलर असल्याने पाठविण्यात आले. रोजची आवक व जावक व नोंद करून दर आठवड्याला त्याचा अहवाल मालेगाव शाखेला पाठवावा लागे. हा पूर्ण कापसाच्या सिझनचा काळ ३-४ महिन्यांचा होता. मारवाडी पद्धतीचे राजस्थानी रूचकर जेवण. रात्री

तुलसी रामायण असे. स्वतः बन्सीशेठ कांकरिया मधून मधून येत असत. आम्ही दोघे एकाच खोलीत राहत असू. सोबतीला धुळयाच्या व्यापाऱ्याचा एक कर्मचारी असे. त्याच्या बरोबरच उज्जैन जाण्याचा योग आला. प्रसिद्ध महाकालेश्वर मंदिराचा दुर्मिळ योग आल्याने मी खूप आनंदित झालो होतो. मंदिराकडे आम्ही पायी पायीच निघालो. लवकर साधन मिळत नव्हते व अंतर ४-५ मैलाचे पण दर्शनाची ओढ लागली होती. शेवटी एक टांगा आला व आम्हाला थांबवून मंदिराकडे घेऊन गेला. त्याने आमच्याकडून काहीही पैसे घेतले नाहीत त्यामुळे आमच्या श्रद्धेला त्यावेळी बळ मिळाले होते. सेंधव्याला असतांना हिंदी वर्तमानपत्र वाचत असे. सिझन संपला आणि मी परत शाखेत मालेगावी आलो.

आल्यानंतर इतर कामाबरोबर शेतीविषयक कामात मग्न होऊ लागलो. कधी कधी नूतनीकरणाच्या फॉर्मवर सह्या घेण्यासाठी उमराणे-सौंदाणे-आराई या ठिकाणी जाऊन मुक्काम करावा लागे. माझे त्यावेळचे अधिकारी श्री. भंडारी उमराणे असले की माझ्यासोबत येत असत. त्यांचे एक नातेवाईक तिथे असल्याने आमची राहण्याची चांगली सोय होत असे.

उमराणेंच्या श्री. मोहन देवरेंचा उल्लेख करावाच लागेल. ते व्यवसायाने कंत्राटदार होते व जर आम्ही तिथे असलो तर घरी

मुक्कामाला व जेवायला बोलवत असत. श्री. ग्यानदेवदादा देवरे त्यावेळी नासिक जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे चेअरमन होते. श्री. मोहनशेठ यांचे ते चुलते. त्यामुळे एकदा रात्री त्यांच्याच बरोबर जेवण्याचा योग आला. मला राजकारणात असूनही प्रेमळ असणारी माणसे त्यामुळेच आवडतात.

मी काही काळाने छोटी छोटी कर्ज प्रकरणे हाताळू लागलो. विहिर काम, इले. मोटार, अशी तुरळक नवीन कर्ज प्रकरणांत मी अतिशय मनापासून काम करत असे. एक दिवस सूपडू हिरे नवीन ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी मॅनेजरच्या केबीनमध्ये येऊन बसले होते. मला बोलावल्याने तिथे गेलो. प्राथमिक चर्चा झाल्यावर आधी त्यांचे इन्स्पेक्शन करायचे असे ठरले.

आधार बु. च्या सावळी विहीर शिवारात  त्यांची जमीन होती. त्यावेळी तिथे कॅनॉलचे पाणी असल्याने पाणी बऱ्यापैकी असे. ऊस हे पीक जास्तीत जास्त क्षेत्रावर घेत असत. श्री. सूपडू हिरे हा एक तरुण व प्रगतशिल  शेतकरी होता. ग्रामीण नासिक जिल्ह्याचे राजकीय नेतृत्व त्यावेळी अर्थातच कॉंग्रेसकडे असल्याने तालुका पातळीवर तो त्यांच्या मित्राबरोबर सक्रिय होता. श्री. नामदेव निकम त्यावेळी तालुका अध्यक्ष होते व बाजार समितीचे चेअरमन होते व सूपडूचे घनिष्ठ मित्र.

सकाळचीच वेळ. सूपडू हिरे शाखेत ११ च्या दरम्यान आला. त्यावेळी त्याच्याकडे जावा मोटार सायकल होती. पांढरे शुभ्र कडक इस्त्रीचे कपडे त्याला उठून दिसत होते. मी शाखेतून त्याच्याबरोबर श्री. वैद्य साहेबांना सांगून (शाखाधिकारी) निघालो. मालेगावपासून जास्त अंतर नव्हते त्यामुळे ४०-४५ मिनिटांत आम्ही त्याच्या घरी पोहोचलो. त्यावेळी ट्रक्टरचे प्रकरण म्हणजे ३०-३५००० रु.चे कर्ज. पण रक्कम मोठी वाटत असे. जास्त काळजीपूर्वक करावे असा जणू दंडक असे. मी त्याच्या शेतावर फेरफटका मारला. वडिलांची व त्याची १५-१६ एकर कॅनॉल बागायत जमीन होती. जरूरपुरते धान्य गहू तो घेत असे व जास्तीत जास्त क्षेत्र ऊसाखाली. त्यावेळी दाभाडी कारखाना जोमात होता. एक उत्कृष्ट व चांगला साखरेचा उतारा व जास्तीत जास्त गाळप क्षमता म्हणून त्यावेळी तो राज्यात अव्वल क्रमांकावर होता. दरवर्षी सूपडू व त्याचे वडिल आनंद वेडू हिरे ह्या दोघांच्या मागील २-३ वर्षांच्या उसक्षेत्राची व कारखान्याला पाठवलेला उस त्यांची टनामधील नोंद व आलेली रक्कम याची नोंद मी घेतली. त्यांनी जेवण्याचा आग्रह केला पण मी नंतर निश्चित येईल म्हणून त्यावेळी टाळले. २-३ तास शेतावर थांबून मी सूपडू बरोबरच परत निघालो.

यावेळी येताना आम्ही मालेगाव कॅंपच्या हिरे कॉलेजच्या बाजूने आलो. कॉलेजच्या कॉर्नरवर वळताना सूपडूने त्याची जावा

मोटार सायकल थांबवली. मी मोटार सायकलवर पाठीमागेच बसलो होतो. दोघेपण न उतरता सूपडूने नवी कोरी १०० रु.ची नोट त्याच्या वरच्या खिशातून काढली व माझ्याकडे वळून ती माझ्या हातात देण्यासाठी पुढे केली.

मी त्याला म्हटले, सूपडू हे काय?

आजच्या इन्स्पेक्शनसाठी. पाहिजे असेल तर नंतर अजून देईन. पण एवढे आता घ्या.

मी गाडीवरून न उतरताच त्याला मी हे घेणार नाही हे ठामपणे सांगितले.

त्याने खूप विनंती केली. हे प्रेमापोटी घ्या म्हटला पण् माझ्या नोट न घेण्याच्या पक्क्या निर्धाराने त्याला ही नवल वाटले. तो ज्या रोजच्या व्यवहारात वागत होता त्याला कदाचित हा अपवाद असावा किंवा असे काही नाही म्हणणे त्याला अपेक्षित नसावे.

शेवटी त्याचा नाईलाज झाला. त्याने मोटार सायकल चालू केली व १०-१५ मिनिटांत आम्ही शाखेत पोहोचलो व सरळ श्री. वैद्य साहेबांकडेच गेलो. प्रकरण मंजूर झाल्यावर त्याचा नवीन इंटरनॅशनल ब्रॅंडचा ३५ एच. पी. चा ट्रॅक्टर आला.

काही दिवसांनी पुन्हा पोस्ट सॅक्शन इन्स्पेक्शनच्या निमित्ताने सावळी विहीरीवर जाणे झाले. त्यावेळी मात्र त्याने आधीच जेवण तयार करून ठेवले होते. खानदेशी पाहुणचार मी प्रथमच घेत होतो. त्याचे वडिल पण होते. आनंदा वेडू हिरे हे तर श्री. व्यंकटराव हिरेंचे राजकीय सहकारी.

दोन पाटे मांडली. एका पाटावर बसून दुसऱ्या पाटावर ताट. आज सूपडूच्या पत्नीने मांडे केले होते. मी प्रथमतःच मांडेचा आस्वाद घेत होतो. आजही त्या मांड्यांची स्वादिष्ट चव जिभेवर ताजी आहे. घरच्याच गाईच्या तूपाचा वासपण मी आजही जणू अनुभवतो असेच वाटते.

यानंतर मी १९९५-९६ ला मालेगावाला वरिष्ठ शाखा प्रबंधक म्हणून म्हणजेच मॅनेजर म्हणून गेलो होतो. मी पुंजाराम बोरसेला सूपडू बद्दल विचारले. २० वर्षांनंतर त्याची पुन्हा भेट घ्यावी असे वाटू लागले.

मी व बोरसे असाच एक दिवस त्याच्या घरी व शेताकडे गेलो. २० वर्षानंतरचे चित्र पूर्ण बदलले होते. १९७३ चा तो ट्रॅक्टर धूळ खात पडला होता. कॅनॉलचे पाणी आता बारामाही नव्हते. सावळी विहीर म्हणून ज्या जागेची उसासाठी ख्याती होती तिथे आता उसाचे क्षेत्र नावालाच राहिले होते. दाभाडी कारखान्यात

१९७२-७३ ला सोन्याचा धूर निघत होता तो कारखाना बंद पडला होता. माझ्यापुढे मला कडक इस्त्रीत पांढऱ्या कपडयात आलेला सूपडू दिसला पण् आज जो समोर होता त्याचे कपडे मळके होते, चेहरा उदासीन होता.

दुधदुभते पण नव्हते. कारण पाणीच नव्हते जनावरांना. मी ५-१० मिनिटे घरी थांबून बिनदुधाचा व गुळाचा चहा सूपडू बरोबर व बोरसे बरोबर खूप आनंदाने पण खिन्न मनाने घेतला.

येताना सूपडूला परत चांगले दिवस यावेत या भावनेने उठलो व बोरसे बरोबर मोटार सायकलवर बसून शाखेत यायला निघालो.

२० वर्षांनंतर हे असे स्थित्यंतर का व्हावे? शेतकरी समृद्ध कधी होणार? जो समृद्ध होता त्याची ही अशी अवस्था का व्हावी? निसर्ग लहरी आहे का? असे अनेक प्रश्न मी बोरसेंना विचारत होतो. याची उत्तरे बोरसेंकडे तरी कुठे होती? माझ्या डोळयांसमोर १९७३ मध्ये सूपडूने देऊ केलेली ती नवी नोट येऊन कधी अदृश्य झाली कळालेच नाही.

# अडाणी शेतकऱ्याची गोधडी

आम्ही ५-६ जण मागच्याच आठवडयात आमच्या बँकेतील मित्राकडे त्याच्या शेतावर गेलो होतो. पलांडे निवृत्तीनंतर वडिलांची शेती सांभाळत होता. स्वतः एम. एस्सी. (ॲग्री.) असल्याने अतिशय लक्ष घालून शेती करत होता. त्याने केशर आंब्याची लागवड ४-५ वर्षांपूर्वीच केली होती. पहिल्या हंगामात चांगले पीक आले होते. पण दुसऱ्या टप्प्यात मात्र आंब्याला आतून आळी लागल्याने व त्यावर काळे डाग आल्याने देठ कापून ते सर्व कैऱ्या म्हणून विकायचे त्यांनी ठरविले होते. आम्ही सगळे चहा पीत असतांनाच त्याने हे सांगितले. त्यात आमच्याच श्री. विठ्ठल चव्हाण या कराडच्या मित्रानी मागच्या वर्षी सोयाबीन पिकाची कहाणी सांगितली. हमी भावाच्या निम्म्या किमतीत ते विकावे लागले व त्यामुळे खर्च ही सुटला नव्हता व टोमॅटो तर फेकून दयावे लागले असे सांगितले.

आम्ही सर्व त्याच्या शेतातून सायंकाळी पुण्याला घरी आलो. मी निवांत बसलो होतो. मला थोडी नकळत तंद्री लागली होती. ५० वर्षांपूर्वीची घटना माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली.

मी बँकेत नोकरीला लागून ३-४ महिनेच झाले होते. १९७२ च्या दुष्काळाच्या झळा खूप तीव्र होत्या. त्यातच शेतकऱ्यांची एक दुष्काळ परिषद दाभाडी साखर कारखान्यावर घ्यायची ठरले होते. मला श्री. वैद्य साहेबांनी फक्त आदल्याच दिवशी याची कल्पना दिली होती.

दुसऱ्या दिवशी दुपारी कारखान्याची जीप आली. श्री. वैद्य साहेब व मी दोघेही कारखान्याच्या सभागृहात पोहोचलो. श्री. त्रंबक पवार कारखान्याचे चेअरमन होते. ते स्वतः एक नामवंत वकील पण होते. त्यांनी परिषदेचे आयोजनाबद्दल प्रास्तविक केले व अशा परिस्थितीत कारखाना काय करतो, शेतकऱ्यांना कशी मदत करतो हे सविस्तर सांगितले. श्री. वैद्य साहेब व मी दोघेही कारखान्याच्या सभागृहात पोहोचलो. कारखान्याचे गाळप सरासरी इतके होत होते. पण अशीच पाण्याची कमतरता राहिली तर ७३-७४ चा हंगाम कठीण जाणार होता. त्यांनी श्री. वैद्य साहेबांना बोलण्याची विनंती केली. श्री. वैद्य फक्त २-३ वाक्ये बोलले व बँक आपणाला काय मदत करू शकेल याबाबत आमचे शेतकी अधिकारी पंदारे मार्गदर्शन करतील असे म्हटले.

मी बँकेच्या कृषी कर्जाच्या सर्वच योजना अगदी सविस्तर पण थोडक्या शब्दात सांगितल्या. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विहीर

खोदणे, सिंचनक्षमता वाढविणे, जुन्या विहिरींची अजून खोली वाढवायची असेल त्यासाठीची योजना मात्र विस्तृत सांगितली. या परिषदेनंतर त्याचा सकारात्मक प्रतिसाद नजीकच्या १०-१५ दिवसांत दिसला.

एक दिवस दुपारी दाभाडी पिंपळगाव या गावचे तीन शेतकरी एकत्र आले होते. शाखा त्यावेळी जुन्या शहांच्या जागेत होती व मॅनेजर केबिन व कर्ज विभाग पहिल्या मजल्यावर होता. तिघेही केबीनमध्ये गेल्याचे मला विवेक काशीकरने सांगितले. वैद्य साहेबांनी ५ च मिनिटांत मला बोलावले. त्यातील माधव सोनवणे हा शेतकरी अस्सल अहिराणी भाषेत सांगत होता. वैद्य साहेबांना काहीच उमगेना. मी तो काय म्हणतो हे त्यांना सांगितले. नंतर तिघांना साहेबांनी माझ्याशी पुढची चर्चा करायला सांगितले. नंतर मी तिघांची गरज समजावून घेतली. सोनवणेला कमीत कमी दोन परस म्हणजे १४ फूट खोल विहीर करायची होती. कौतिक पवारला नदीपात्रातून पाईपने पाणी आणायचे होते तर भिला पवार सगळ्यात वृद्ध होता. त्याला विहिरीचे बांधकाम करायचे होते. कारण मातीने खचून पाण्याचा उपसा होत नव्हता व साठा होण्यास अडचण होती. झाले. मी त्यांना सर्व कागदपत्रे आणायला सांगितले. मी मीच अर्ज भरून घेतले.

नंतरच्याच आठवडयात आवश्यक ती कागदपत्रे त्यांनी आणून दिली. कामाचे अंदाजे खर्चाचे इस्टिमेट साखर कारखान्याकडून त्यांनी आणले होते. फेब्रुवारीला महिना असल्याने १-२ महिन्यांत काम होणे गरजेचे होते. त्यांना विचारून कधी शेतावर जायचे ते मी ठरविले.

एके दिवशी दुपारी मी पिंपळगावला पोहोचलो. पहिली भेट सोनवणेंची झाली. वयाने ४५-५० च्या दरम्यान. पण थकलेला होता. आधी शेतावर जायचे ठरले. त्याने कौतिकला घरी जाऊन बोलावले. कौतिक मालेगाववरुन परत आला नव्हता. त्यामुळे आम्ही दोघेच सोनवणेंच्या शेतावर गेलो. ४-५ एकरच जमीन होती.

विहीर बागायतीवर शेती अवलंबून होती. यावर्षी पाण्याअभावी आडसाली ऊस जाळून गेला होता. सुरूची लागवड तग धरून होती. बाकी गहू, हरभरा, ज्वारी हे पीक घेतले होते पण पाणी कमी पडत होते. विहीर खूप जुनी होती. २-३ पिढयापासूनची असावी. खाली काम केले तर रब्बीची पिके जगणार होती व सुरू उसाची केलेली लागवड जी तग धरून आहे ती कदाचित कारखाना २-३ महिना चालला तर ३०-४० टन तरी येईल अशा आशेवर सोनवणे होता. संध्याकाळ झाली होती. त्यामुळे मुक्काम करणे भाग होते. कौतिक पवार मोटार सायकलवरून मालेगावी गेला

तोही अजून आला नव्हता. भिलाचे घर शेतातच होते त्यामुळे सकाळीच त्याच्याकडे जायचे ठरले. मी सोनवणेंच्या घरी आलो. घर एकदम साधे होते. लाकडी बाज होती. त्याने बायकोला चहा करायला सांगितला. तिने गुळाचा चहा चालेल का? म्हणून आतूनच विचारले.

मी चालेल म्हटल्यावर सोनवणे दोन कप चहा घेऊन बाहेर आला. रात्री जेवायला त्याच्याकडेच थांबायचे होते व मुक्काम पण. सोनावणेंनी बोलता बोलता गावाची माहिती सांगितली. कारखान्याचे चेअरमन श्री. त्रंबक पवार याच गावचे होते. सोनावणेंच्या एका मुलीचे लग्न झाले होते. दुसरीचे २-३ वर्षांनी लग्न करायचे होते. त्याला मुलगा नव्हता हे सांगताना तो थोडासा नाराज वाटला. त्याच्या घरात लाईट नव्हती त्याने दोन रॉकेल वरच्या चिमण्या लावल्या. त्या मंद प्रकाशात व रात्रीच्या वेळात सगळे कसे शांत व स्तब्ध वाटत होते. गाव ३००० ते ३५०० वस्तीचे. मोजकी घरे गावात होती; बाकी शेतावरच राहत होते. चुलीवर चाललेल्या स्वयंपाकाची जाणीव बाहेर बसून येत होती. आम्ही दोघांनी बाजरीची भाकरी व शेवग्याच्या शेंगांच्या भाजीचा आस्वाद घेतला. चुलीवरच्या स्वयंपाकाची चव मला माहित होती आमच्या घरी पण आई चुलीवरचा स्वयंपाक करीत होती. तुम्हाला गोड-धोड काही करता आले नाही अंगावरच्या नऊवारी साडीच्या

पदराने घाम पुसत सोनवणेच्या पत्नीने म्हटले, ‘‘अहो हेच तुम्ही केलेले किती गोड आहे यापेक्षा गोड-धोड तरी कशाला पाहिजे?’’ मी जेवण झाल्यावर त्यांना म्हटले.

पुन्हा एकदा जेवण झाल्यावर कौतिक पवारच्या घरी आम्ही दोघे गेलो होतो. तो मालेगाव वरून आला होता. त्याला मी चहा नको म्हटले. त्याने मग ग्लासभर दूध घ्यायचा आग्रह केला. कौतिकने दोन वर्षांपूर्वीच घर बांधले होते. घरावरून व राहणीवरून तो सुखवस्तू वाटत होता. सकाळीच मी येतो आपण दोघे भिला पवारच्या व तुमच्या शेतावर जाऊ असे सांगून मी त्याचा निरोप घेतला.

सोनवणेच्या घरी आलो तोपर्यंत त्याच्या १४-१५ वर्षाच्या मुलीने बाजेवर गोधडी टाकली होती. दुसरी एक स्वच्छ गोधडी पांघरून म्हणून ठेवली होती. मंद वारा मंद ज्योतीचा प्रकाश व ऊबदार गोधडी यामुळे मला शांत झोप लागली होती.

सकाळीच आम्ही आवरून कौतिकच्या घरी गेलो. त्याने पोह्याचा नाष्टा तयार ठेवला होता. भरपूर दुधाचा चहा घेऊन आम्ही दोघेच शेतावर गेलो.

गिरणा नदीचे पात्र आटत चालले होते. बरेच शेतकरी नदीकिनारी १-२ गुंठे जमीन घेऊन तिथे विहीर करून पाईपलाईन

टाकत होते. कौतिकने अशीच २ गुंठे जागा चार-पाच वर्षांपूर्वीच घेतली होती. त्या विहिरीत ३-४ तास उपसा होईल एवढे पाणी असे. तिथून शेतावर १५०० फूट तरी ३’ इंची पाईपलाईन केल्यावर दुष्काळात पिके तग धरणार होती. कॅनाल बागायत होते चारमाहीचे; पण त्याची आवर्तने ७२ च्या दुष्काळात कमी झाली होती. कौतिक तसा तरुण व उत्साही व धडपड करणारा शेतकरी होता. त्यांचे क्षेत्र सोनवणेपेक्षा जवळजवळ दुप्पट होते; त्यामुळे २-३ एकर ऊस नेहमी असे. रब्बीत हरभरा, गहू ज्वारी ही पिके २ ते ३ एकरात कौतिक पण घेत होता. त्याला मी भिलाकडे जाऊ असे म्हटले. मोटरसायकलने दहा मिनिटांच्या अंतरावर भिलाचे शेत होते. आम्ही दोघे भिलाकडे आलो. शेतावरच वस्ती असल्याने घर साधेच; पण समोर बरीच मोकळी जागा. झाडाखालीच भिला एका लाकडी खाटेवर बसला होता. तो पागोटे घालत होता; जाड भिंगाचा चष्मा घालायचा. आम्ही तिथे पोहोचलो. दुपारचे ११.३० तरी वाजले होते. आम्ही दोघे भिलाच्या लाकडी खाटेवर बसलो. दोन ग्लास गरम दूध भरपूर साखर घातलेली असे. त्याच्या तरण्याताठया मुलाने ते आम्हाला दिले. त्र्यंबक पवार हा त्याच्या भावाचाच मुलगा, जो आज चेअरमन आहे. भिलाने मोठया कौतुकाने माहिती पुरवली. विहीर जवळच होती. खूप खचली होती. तिथे कॉंक्रीटच्या कडयाने बांधकाम करणे गरजेचे होते.

त्यावेळच्या खर्चाच्या अंदाजाप्रमाणे ८-१० हजार रु. चा खर्च येणार होता. पाण्याचा उपसा ८-१० तास होत होता. पण पण माती पडून खचल्याने तो कमी झाला होता. भिला या तिघांमध्ये जास्त वयस्कर होता. मुलगा शेती पहात होता; पण ७/१२ च्या नोंदी अजून भिलाच्या नावावर होत्या. दुपारचे जेवण करण्याचा कौतिकने आग्रह केला. पण मी पुन्हा नंतर येईल त्यावेळी पाहू म्हटले. आता तिघांच्याही नोंदीचा शोध वकिलांकडून घेऊन गहाणखत करावे लागेल म्हटले. भिलाने त्र्यंबक पवार वकिलांकडे पेपर द्या म्हटले. सुदैवाने ते बँकेच्या पॅनेलवर होते व वैद्य साहेबांचे शेजारी होते; त्यामुळे अडचण नव्हती.

२ दिवसांनीच संबंधित कागदपत्रे वकिलाकडे पाठवून दिली. Search certificate आल्यावर रितशीर तिघांचेही गहाणखत केले. त्यानंतर त्यांचे मंजूर रकमेपैकी काही रक्कम वितरण केली. सोनवणेनी १०-१५ दिवसांनी येऊन काम पूर्ण झाल्याचे व आता पाणी ८-१० तास पुरेल इतके येते असे सांगितले. त्याच्या चेहऱ्यावर सांगताना तेज वाटत होते. मलाही बरे वाटले. त्याची रब्बीची पिके जगणार होती. कौतिकच्या पाईपलाईनचे काम पण झाले होते. बिलाच्या कामाला मात्र सिमेंट कॉँक्रीटच्या कडया मिळायला उशीर झाल्याने जवळजवळ एक महिना गेला.

आता मीही दुसऱ्या कामात अडकल्याने या तिघांच्या कामाचे काय झाले हे पाहण्यात दुर्लक्ष झाले. तेवढयात वैद्य साहेबांनी मला बोलावले. श्री. पवार वकिलांनी तिघांच्या शोधणावळ (Search) चे बिल त्यांच्याकडे दिले होते. ते बिल एकूण रुपये ५१० चे होते. बिल पाहून माझे डोळे गरगर फिरायला लागले. प्रत्येकाचे रुपये १७० बिल म्हणजे त्या वेळच्या प्रचलित फीचे जे दर होते त्याच्या ४ ते ५ पट होते. मी वैद्य साहेबांना म्हटले की, पवार वकिलांनी खूपच जास्त बिल लावले. पण वैद्य साहेबांनी बिल तर द्यावेच लागेल म्हटले. आपण डी. एस. कुलकर्णीकडे नेहमी देतो व ते होते ३० ते ५० रुपये एका Search चे घेतात; पण या तिघांनीच श्री. पवार वकिलांचे नाव सुचवले, त्यामुळे आपण तरी काय करणार? श्री वैद्य साहेब यांनी म्हटले.

दुसऱ्या दिवशी भिला पवार म्हणजे पवार वकिलांचे चुलते मजुरीचे पैसे घेण्यास शाखेत आला. बरोबर सोनवणे सोबत म्हणून आला होता. मी दोघांना घेऊन वकिलांचे बिल देण्याबाबत वैद्य साहेबांकडे गेलो. दोघांनाही या बिलाची कल्पना दिली व हे बिल त्यांनी जास्त आकारले असे वाटते हे माझे मत त्यांना सांगितले. भिला पवार तर खूप चिडला होता. त्र्यंबक तर सख्खा पुतण्या. मला वाटले घरचेच काम म्हणून फक्त खर्च आला तेवढेच घेईन, कदाचित वकील फी घेणार नाही. म्हणूनच त्याचे नाव सांगितले.

भिला आज पवार वकिलांचा एकेरी उल्लेख करत होता. वैद्य साहेबांनी दोघांनाही शांत केले. आता तुमच्याकडे पैसे नसतील तर तुमच्या कर्जखात्याला रक्कम नावे टाकून त्यांचे बिल देऊ म्हटले.

माझ्यावर या घटनेचा चांगलाच परिणाम झाला होता. मी याचे स्फुटलेखन त्यावेळी महाराष्ट्र टाईम्स वर केले होते व ते आलेही होते. माझे शीर्षक होते ''अडाणी शेतकऱ्यांची गोधडी शिवणार तरी कोण?'' त्यांचीच नात्याची / ओळखीची सत्तेत असलेली जबाबदार व्यक्ती त्यांची अशी लूट करणार तर त्याच्या गोधडीला किती ठिगळे पडतील व ती शिवायला कोण पुढे धज़ेल का?" आज तर शेतकरी संघटनेची पण शकले झाली आहेत. पक्षा-पक्षात त्याचे तुकडे पडले आहेत. सगळ्यांचा पोशिंदा बळीराजा आज आशेने आपणा सर्वांकडे पहात आहे. त्याला या व्यवस्थेतून सावरण्याचे काम कधीतरी होईल का? की महात्मा ज्योतिबा फुलेंनी व्यक्त केलेली शेतकऱ्यांचे आसूड पुस्तकातील वेदना अजूनही ताजी आहे, त्यावर साधी फुंकर पण आपण घालू शकणार आहोत की नाही?

# रक्षाबंधन

आज नारळी पौर्णिमेचा दिवस म्हणजेच रक्षा बंधनाचा; पण श्रावण महिन्यातील हा सण भाऊबहिणीच्या नात्याला उजाळा देणे व एकमेकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण. निसर्ग पण नटलेला असतो. बहुतेक ठिकाण हिरवेगार मखमली गालिचे अंथरल्याचा भास व्हावा असे नयनमनोहर दृश्य. श्रावणातल्या सरींचे तुषार अंगावर पडावेत व अंग ओलेचिंब नाही पण रोमांच उभे राहण्यात या पावसाच्या हळुवार स्पर्शाने सज्ज असते. कधी वाटते या सणाला निसर्गाने दिलेली ही साथ तर नाही ना?

प्रसाद व योगेश गेली १४-१५ वर्षे इथे नसल्याने ताईला म्हणजे माधवीला रक्षा बंधनाचा सण साजरा करता येत नाही. ती Virtual च राखी बांधत असते. आम्ही जर्सीला गेलो त्यावेळी रक्षाबंधन साजरे केले पण ते रश्मी-शामल-आर्या कृष्णा व सौ. शोभाने आम्हाला - प्रसादला व योगेशला राखी बांधून. एकदा मंचरहून आण्णा म्हणजे सौ. शोभनाचा भाऊ मुद्दाम राखी पौर्णिमेला पुण्याला घरी आल्याचे आठवते. पण आज मात्र यापैकी काहीच नव्हते. तरीही नारळी भाताचा बेत मात्र हमखास घरी केला

होता. मी घरात गॅलरीत बसून चिमुकल्या बहिणींची बाहेर चाललेली लगबग पाहात होतो. काहींचे कपडे एकदम नवीन काहींचे धुवून इस्त्री केलेले. पण उत्साह मात्र सारखाच होता. त्यात नवे जुने असा भेद अजिबात नव्हता. काही चिमुकली भावंडे नेहरू शर्ट - टोपी वर तर काही स्वच्छ टी शर्ट घालून इकडून तिकडे बागडत होती. मी गच्चीतच खुर्चीवर बसून हे सगळे पाहात होतो. विचाराच्या तंद्रीत मग्न होऊन गेलो होतो. मला कॉलेजला असतानाचे दिवस आठवले. ते साल १९६८-६९ असावे. मी आमच्या कृषिमहा विद्यालयाच्या दुसऱ्या वर्षाला होतो. खरे म्हणजे ८०-९०% लोकांचा जेवणाचा डबा गावावरून एसटीने यायचा. ओतूर, जुन्नर, मंचर, आणे, खेड ह्या ठरावीक एसटी सकाळीच ९.३० ते १०.३० च्या दरम्यान शिवाजीनगर स्टँडला यायच्या. बहुतेक कॉलेजचे विद्यार्थी डबा घेण्यासाठी येत. नाहीतर डबा उतरवण्याची सोय तेथील ४-५ माणसे विद्यार्थ्यांसाठी करत असत. आम्ही त्यावेळी त्यांना ३ रु. ते ५ रु. महिना देत असू. तो एक ४-५ जणांसाठी रोजगारच झाला होता. मी पासलकर, रोकडे, तिरंदाज खरमाळे, दाते आम्ही सगळे एकत्र बसून रात्रीचे जेवण करीत असू. उन्हाळ्यात भाजी खराब होणे हे बऱ्याच वेळी घडे. कधी कधी खर्चासाठी ५ ते १० रुपये डब्यातून येत असत. ती ५-१० रु. ची नोट कागदात गुंडाळून पाठवलेली असे. ती नोट पाहून

किती आनंद होत असे. आज ५०० रु. ची नोट पाहून पण होत नाही.

आमचे दादा म्हणजे माझे चुलते गावी म्हणजे आण्याला एसटीत डबा घेऊन जात. जर दादा नसले तर हे काम वडिलांना करावे लागे. आई ७ वी ला असतानाच बाळंतपणात गेल्याने चुलती व बिरुशेठची बायको म्हणजे सुमन वहिनी डबा करत असे. असे कॉलेजचे ४ वर्षे मी काढले आहेत. पण दुसऱ्या वर्षाला असताना दादा काही दिवस राजुरीला गेले व त्याबरोबर चुलती व वहिनीपण. त्यामुळे ऐन जुलै-ऑगस्ट मध्ये १-२ महिने मेस लावावी लागली. कॉलेजमध्ये मेसचे पण वर्गीकरण होते. इ मेस म्हणजे सगळ्यात कमी महिना द्यावा लागणारी मेस. कारण तेथे बरीचशी कामे विद्यार्थी करत होते. वाढण्याचे, आवरण्याचे स्वयंपाकाला मदत करण्याचे सुद्धा. त्यामुळे इतर मेसच्या तुलनेत ह्या मेसचे बिल निम्मे कमी येई. ५०-६० रुपये महिना असे. मला हीच लावणे भाग होते कारण दुसऱ्या मेसचा खर्च मला परवडणारा नव्हता.

कॉलेजला आज रक्षाबंधनाची सुट्टी होती. बऱ्याच जणांच्या राख्या डब्यातून आल्या होत्या, काही पोस्टाने आल्या होत्या. काही जण पुण्यातल्या बहिणींकडे राखी बांधायला मोठया उत्साहाने गेले होते. मी कॉलेजच्या होस्टेलवर रूम मध्येच होतो.

खरमाळे, दाते बाहेर गेले होते. मी एकटाच होतो. बाहेरचा रक्षाबंधनाचा उत्साह माझ्या गावी जणू अजिबातच नव्हता. सांयकाळची वेळ होती. सूर्यास्त झाला होता, बाहेर अंधार पडू लागला होता. माझ्या मनातली सायंकाळ केव्हाच चालू झाली होती. खोलीत मंद दिवे नव्हते. त्यामुळे मी लाइट लावलाच नाही. बराच वेळा झाला. ई मेसला जेवण्यासाठी जावे लागणार होते. खरमाळे माझ्याबरोबर आज मेसला येणार होता. कारण त्याने माझ्यासाठी दोन महिने मेस लावली होती. दातेचा डबा मात्र चालू होता. मी खुर्चीवर बसून समोरच्या टेबलावर डोके घालून उगीचच अस्वस्थपणे बसलो होतो.

इतक्या वर्षांत मला या सणाचे कधीच काही वाटले नव्हते. मला दोन चुलत बहिणी होत्या पण त्यांची लग्ने माझ्या खूप लहानपणीच झाली होती. त्यामुळे बहिणीकडून राखी बांधण्याचे काही कारणच नव्हते. नाही म्हटले तर आई आम्हा सगळयांना दुसऱ्याला व दिवाळीच्या पाडव्याला उत्साहाने ओवाळीत असे. पण आई जाऊन पण आज ७-८ वर्ष झाली होती. बहीण भावाचे नाते इतके प्रेमळ असते का ज्यामुळे माझे मन इतके अस्वस्थ व्हावे? काहीही असो तसे झाले होते खरे. खोलीचे दार थोडे उघडेच होते. दादाभाऊ खरमाळे आल्याची चाहूल मला लागली.

कारे अंधार? लाईट लावली नाही का? खरमाळेंनी लाईट पंखा लावत मला विचारले. तो पुण्यातून एका नातेवाईकाकडून आला होता. त्याच्या हातात छानशी गोंडस पिवळया रंगाची रूपेरी राखी होती. कपाळाचा गंध अजूनही ओलाच होता.

मी स्वत:ला सावरून त्याला विचारले, कुठे गेला होतास? तो म्हटला शक्रवार पेठेत मंडईजवळ एक मावशी राहते. तिने खुप आग्रह केला. तिची एक १२-१३ वर्षाची मुलगी आहे. तिनेच राखी बांधली. घरीच केलेले गुलाबजाम व नारळीभात दिला. आता मेसमधील स्वीट डीश कशी जाणार सांग सुरेश?

तो मलाच प्रश्न विचारीत होता. मी म्हटले, मामा आपली वाट पाहात असतील आठ वाजून गेलेत. जायला पाहिजे. दोघांनीही हातपाय धुतले. मी बऱ्यापैकी कपडे घालून तयार झालो. दादाभाऊ तयारच होता.

मामा म्हणजे, ‘ई’ मेसचा व्यवस्थापक रांगडा शेतकरी गडी. वय ३५ च्या दरम्यान. पण २-३ वर्षापासून मेसचे व्यवस्थापन पाहातो. खर्चाला व हिशोबाला विद्यार्थी मदत करीत होते. आम्ही मेस मध्ये आलो त्यावेळी ८-३० वाजून गेले होते.

“सगळे जेवण करून गेले तुमची दोन ताटे तयार ठेवलीत.” मामांनी आम्हा दोघांना आत आल्यावर सांगितले.

आज मामांनी पण नारळी भात केला होता. श्रीखंड पुरीचा बेत केला होता, खरमाळेंनी थोडेच वाढा म्हटले. मी मामांच्या घरच्यांनी तयार केलेल्या जेवणाचा चांगला आस्वाद घेतला. मामा जेवता जेवता गप्पा मारत होता. तेवढ्यात त्याचे लक्ष खरमाळेंकडे व माझ्याकडे गेले.

खरमाळेंच्या हातातील राखी व माझा हात मात्र सुना सुना. हे त्याला जाणवले. खरमाळेनेच सर्व सांगितले. सुरेशला बहीण नाही. त्यामुळे आज पहिल्या प्रथम मी त्याला इतका नाराज अस्वस्थ पाहातो. नाहीतर त्याच्या हसऱ्या, खेळकर, स्वभावाशी हे पूर्णपणे विसंगत आहे, म्हटला. आमची जेवणे झाली होती. मामांनी ५-१० मिनिटे थांबा म्हटले.

मामांची पत्नी आली. तिने आम्हा दोघांना हात जोडून नमस्कार केला. तिची १३-१४ वर्षांची मुलगी छान परकर व पोलके घालून बाहेर आली.

मामांनी खाली दोन पाटे मांडले. त्याच्या पत्नीने छान रांगोळी पाटापुढे काढली. मामांनी घरात तयार करून ठेवलेले ओवाळणीचे ताट आणले. आम्हा दोघांनाही बसण्याच्या खुणा केल्या.

आम्ही दोघेही आग्रहामुळे पाटावर बसलो. आधी त्याच्या मुलीने तिला घरात बेबी म्हणत होते. आम्हा दोघांनाही ओवाळले. तिची आई तिला सूचना देत होती. साखर आमच्या दोघांच्या तोंडातही घातली व २ साध्या पण गोंडस सोनेरी रंगाच्या राख्या त्या बेबीने आम्हा दोघांनाही बांधल्या. आम्ही त्या धाकटया बहिणीला काय देणार होतो? माझ्या खिशात १ महिन्यापूर्वी डब्यात खर्चाला पाठविलेले फक्त ५ रु. होते. मी तिला ओवाळणी म्हणून ते ताटात टाकले. खरमाळेकडे काही नाणी होती त्याने पण ओवाळणी टाकली. तिला ती ओवाळणी पाहून काय आनंद झाला होता! नंतर आईने फक्त ओवाळले. नमस्कारांचा सोपस्कार झाला.

मी याने चकित झालो होतो. मग मामाच बोलू लागला.

‘‘माझ्या लक्षात आले की सुरेशच्या हातात राखी नाही. मी घरात गेलो. बेबीच्या आईला ओवाळणीचे ताट करायला सांगितले. बेबीने दुपारीच काही राख्या आणल्या होत्या. आमच्याकडे ४-५ वाजता माझ्या बहिणींची मुले येणार होती. आम्ही सगळेच वाट पाहात होतो. पण अजूनही आले नव्हते. कदाचित उद्या येतील.’’ त्यावेळी आजच्या सारखे मोबाईल फोन नव्हते. त्यामुळे संपर्काचे साधन नव्हते. मामांनी ५ मिनिटांत

आमच्या ह्या अकल्पित रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

आता बरे वाटते ना? खरमाळे व मामांनी दोघांनीही एकाच वेळी मला विचारले. दिवसभराची बैचेनी दूर झाली. हा अचानक झालेला सोहळा पाहून मी ही भारावून गेलो. पण त्यावेळी उतराई होण्यासाठी माझ्याकडे काहीही नव्हते याची खंत मला आज प्रकर्षाने जाणवते.

नाते म्हणजे तरी काय असते? नात्याला रक्ताचे बंधन आहे का? माझ्या नंतरच्या जीवनात मला कितीतरी प्रेमळ माणसे भेटलीत, त्यांनी किती जीव लावला होता. मला सावरगावची देवकर आजी- चंद्रपूरला आम्ही ज्यांच्या घरात राहात होतो. त्या हजारे. त्या तर मला मामाच म्हणायच्या. त्यांच्या तिघा मुलांना त्यांनी मला मामा म्हणायला सांगितले म्हणजे मी तिचा भाऊच झालो होतो. आमची बदली झाल्यानंतर आम्हा दोघांनाही आवर्जून जेवायला बोलावले. व एक स्टीलचे नवे ताट माझ्या ओंजळीत दिले. ही बहिणीची भेट बर का विसरू नका म्हटल्या.

बँकेच्या प्रत्येक बदलीत अशी अनेक कुटुंबे भेटली. येवल्याला असताना आम्ही तिघे म्हणजे होनराव, मी, चिनावले. चैत्र महिन्यात ७ दिवसाचा नवचंडी होम व यज्ञ करत होतो.

त्यावेळी आमचा मुक्काम सुशीलशेठकडे असायचा. सौ. अंजू वहिनी आमची अगदी घरच्या सारखी काळजी घेत होत्या. त्यात त्यांचा काय स्वार्थ होता? कधी कधी स्वार्थाने केलेले प्रेम आपोआप निखळ प्रेम बनते व ते नि:स्वार्थी कधी बनते ते कळतच नाही. आज मात्र अंजू वहिनी नाहीत, कॅन्सरची लढाई त्या २० वर्षांनंतर हरल्या होत्या.

आज हे सगळे आठवले. कारण बाहेरचा राखी पौर्णिमेचा उत्सव. मला नकळत माझ्या कॉलेजच्या दिवसात घेऊन गेला. व मेसमध्ये घडलेला रक्षाबंधनाचा प्रेमळ सोहळा अंतःचक्षुंपुढे उभा राहिला. डोळे पाणावलेत. हृदयातील प्रेमाचा कप्पा उघडलाय. माणसाच्या आयुष्यात असे प्रेमाचे क्षण आले नसते तर त्याचे जीवन किती शुष्क झाले असते नाही?

आज मेसचा मामा कुठे? त्याची ती मुलगी कुठे असेल? माहीत नाही. त्यांनीच मला प्रेमाचा अर्थ कळायला मदत केली.

# ‘शिदोरी देवकर आजी’ ची

आज ४० वर्षांनंतर मी सावरगावला गेलो होतो. थोडा वेळच. लग्न झाले. जेवण झाली आणि जुन्नर किंवा नारायणगावला जायला कोणी सोबत आहे का हे पाहू लागलो. तेवढयात ज्यांच्याकडे मी हायस्कूलवर शिक्षक असताना जेवत होतो त्या देवकरांच्या घरी कोणी आहे का म्हणून पहायला गेलो. घराला कुलूप. लहानच घर पण आजूबाजूला गवत वाढले होते. मी ज्या ओटयावर बसायचो तो तर पूर्ण खचला होता. शेजारचे मारवाडी कुटुंब पण नव्हते. समोरून एक वयोवृद्ध बाई आली.

‘तुम्ही सर का? आमच्या अलकाला ९ वी ला शिकवत होता ना?’

मी ‘हो’ म्हटले.

देवकर आजी आजोबा दिसत नाही. घराला पण कुलूप. मी पुसटशी चौकशी केली.

आजीला जाऊन आता १५ वर्षे तरी झाली असतील.

त्यानंतर एका वर्षांत आजारपणाने आजोबा गेले. तीनही मुले आता मुंबईला गेले आहेत. माझगावच्या चाळीत राहतात.

मला माहीत आहे. मी एकदा गेलो होतो. आजीचा मोठा मुलगा आणि सून चंद्रभागा राहत होती तिथे.

आता कोणी वर्ष वर्ष येत नाही.

आजीला १-२ एकर शेती होती ना.

जावई करतात ती.

अच्छा म्हणजे विठाईचा नवरा का?

हो.

बाईंचा आग्रह होता म्हणून त्यांच्याकडे चहा घेतला आणि त्या कुऱ्हाडेच्या घरातून मी बाहेर पडलो.

घोडेगाव-पुणे गाडी यायची वेळ झाली होती.

मी स्टॅंडवर आलो. सोबत माझे त्यावेळचे एक सहकारी शिक्षक वाघ होते.

मी बस मध्ये बसलो. पुण्याला पोहोचायला २-२.५ तास तरी लागतील. वाघ सर म्हणाले.

दोघांनाही जागा मिळाली होती बसायला.

गाडीने वेग घेतला. माझ्या मनातील विचारांनी पण ७१-७२ चा सावरगावच्या वास्तव्याचा काळ व्यापला होता. फक्त एकच वर्षे काढलं मी त्या हायस्कूलमध्ये पण आयुष्याला पुरेशी एवढी मायेची प्रेमाची शिदोरी मला इथेच मिळाली होती. ८ वी ते ११ वी असे ४ वर्ग होते. सगळ्याच विद्यार्थ्यांनी मला खूप स्नेह दिला. मी पण निरपेक्ष व निःस्वार्थी वृत्तीने गणित व सायन्स हे दोन विषय शिकवले. ११ वीचे क्लास घेतले. विद्यार्थ्यांकडून क्लासची फी घ्यावी असा पुसटसा विचार सुद्धा मनाला शिवला नाही.

मी प्राथमिक शाळेचे गुरुजी व माझा ७ वी पर्यंतचा वर्गमित्र मारुती आम्ही एका लहानशा खोलीत राहत होतो. मारुती तिथे बोर्डिंगला होता. आणि तिथे व्यवस्थापन पाहत होता.

जेवायला मी आधी मारवाडी आजींच्या घरी जायचो. परंतु ते सगळेच १-२ महिन्यांतच बार्शीला राहायला गेले आणि देवकर आजी म्हटल्या सरांना मी जेवण दिले तर चालेल का? असे लोढा आजींना विचारले. झाले मी देवकर आजींकडे सकाळी व संध्याकाळी जेवायला यायला लागलो. मला नक्की आठवत नाही. पण मी ६०-७० रु. महिना देत होतो आजीला.

दोनच खोल्या. पुढे ओटा मागे आंघोळीला १० बाय १० ची जागा. भला मोठा चौकोनी सपाट दगड होता बसायला. गुरुजी

व मारुती जेव्हा जेव्हा घरी आण्याला गावी जात तेव्हा देवकर आजी मला घरीच थांबायला सांगायची.

पुढच्या खोलीत गोधडी टाकायची. आजीचे वय जास्त नव्हते. पण खूप थकलेली होती ती. तिची सून चंद्रभागा बऱ्याच वेळा शेतावर जायची. माझे जेवण बहुतेक आजीच करायची. छोटीशी मातीची चूल होती भाकरी-भाजी एवढेच. पण त्यावेळी मेथीची भाजी आणि भाकरीला अमृताची चव असायची.

सण वार असला आणि मी जेवायला असेल तर आजीची धांदल उडायची. कुरडाया पापडया तळायची. कधी शिरा करायची. डालडा तूप वापरायची. पण चव मात्र गावठी तुपाची यायची.

तिच्या धाकटया अर्जुनचे लग्न ठरले आणि त्यात तर २-३ दिवस मी घरातच मुक्कामाला.

घरासमोर रात्री जागरण-गोंधळ. टेंबा धरून तिचे तीनही मुले नाचत होती. आजीने माझ्या हातात पेटता टेंभा दिला. कपाळावर भली मोठी हळद लावली. अन् वाजंत्र्याला डफ वाजवायला सांगितले.

आजीला माझ्यापेक्षा जास्त आनंद झाला होता.

वर बापापेक्षा लग्नात- वरातीत- गोंधळात मीच मिरवत होतो.

आजीचे आणि माझे काय नाते होते? म्हटले तर मी तिचा सर्वस्व होतो. म्हटले तर मी कोणीच नव्हतो.

तिच्या अर्जुन पेक्षाही मी लहान होतो.

विठाई माझ्यापेक्षा खूपच लहान होती.

जागरण गोंधळ झाला आणि दुसऱ्या दिवशी रविवार होता. हायस्कूलला सुट्टी होती. आजीने आम्हा ३-४ जणांना जेजुरीला जायचे फर्मान बजावले. नवरा-नवरी बरोबर मी पण माझ्या लग्नाआधीच खंडोबाच्या जेजुरीची पायरी चढलो.

कधी कधी मला थोडे थोडे जरी बरे वाटले नाही. ताप खोकला जरी आला तरी आजीच्या काळजात धस्सं व्हायचं.

माझ्या सरांना दृष्ट लागली म्हणायची.

चक्क मीठ मिरची ओवाळून चुलीच्या निखाऱ्यात भिरवून दयायची. मीठ मिरचीचा तडका होणारच. पण आजीला वाटायचे दृष्ट काढल्याने आवाज तडकायचा.

एका वर्षांत आजीने माझी २०-२५ वेळा तर दृष्ट काढली असेल.

दिवाळीच्या सुट्टीत गावकऱ्यांनी नाटक बसवले. ऐनवेळी विनोदी भूमिका करणारे आजारी पडले. तांबोळी टेलर. नाटक तर १५ दिवसांवर आले होते. ती मंडळी मी जेवायला बसायचो.

तेवढयात देवकरांच्या घरात आली.

आजीने त्यांना घोंगडी बसायला टाकली.

४-५ जणांचा चहा ठेवला.

तांबोळी आले होते. सरांनी नाटकातील हे पात्र करावे अशी तांबोळींची इच्छा होती. आजीच्या खरं म्हणजे यातले काहीच समजणे शक्य नव्हते. पण तरीही तिचे सर नाटकात काम करणार या विचाराने ती गहिवरून आली होती.

सर करा हो काम. जमेल ना १५ दिवसांत.

खरं म्हणजे मी कॉलेजच्या ४ ही वर्षांत मराठी हिंदी नाटकांत भाग घेतला होता. हायस्कूलमध्ये एकलव्य नाटक मीच बसवले होते.

अलीबाबा आणि चाळीस चोर ही एक तासाची एकांकिका मी नववीत असताना लिहिली होती. त्यामुळें नाटक मला नवीन नव्हते. आजीने सगळयांना सांगितले. सर करतील काम.

मी पण दुजोरा दिला.

नाटकाच्या दिवशी आजीने तिच्या जवळच्या कितीतरी पाहुणे मंडळींना बोलावून घेतले होते. अगदी आधीच समोरची जागा भली मोठी गोधडी टाकून तिने रिझर्व्ह केली होती. नाटक खूप

रंगले. माझी भूमिका गावकऱ्यांनी डोक्यावर घेतली होती. मी मात्र आजीच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहात होतो.

एकदा क्लास चालू होता. मी भूमितीचे प्रमेय शिकवत होतो. मच्छिंद्र हा चंद्रभागाचा भाऊ आहे हे त्यावेळी मला माहीत नव्हते. खिलारवाडीला चंद्रभागेचे माहेर होते. मी मच्छिंद्रला हातातील गुण्या फेकून मारला. मच्छिंद्र काहीच बोलला नाही. कदाचित सर आपल्या बहिणीकडे जेवतात हे त्याला माहीत असावे.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी जेवायला आजीकडे गेलो. तर चंद्रभागाचा भाऊ म्हणजे मच्छिंद्रचे वडील त्यांच्या घरी. आजी त्यांना सांगत होती. सर मच्छिंद्रचे चांगले व्हावे असेच पाहतात म्हणत होती.

मच्छिंद्र घरी तापट होता. तुमच्या पदरात त्याला घ्या. त्याचे वडिल मला विनवणी करत होते. मी माझे चुकलेच अशा प्रकारे शिक्षा चुकीची होती. पण चंद्रभागा आजीने माझे काहीच चुकले नाही सांगितले. त्याच्याकडे जास्त लक्ष दया म्हटले. तुमचे तो ऐकेल. आजीने यात अडाणी असूनही सुविद्यपणाची भूमिका निभावली होती. मच्छिंद्र खरंच सुधारला. मी त्याच्याकडे आवर्जून

लक्ष देत असे. ११ वी पण पास होऊन मुंबईला कंपनीत कामाला लागल्याचे मला नंतर समजले होते.

देवकर आजीच्या गल्लीत हायस्कूलमधील मुले मुली राहत होते. मी जेवायला बसलो की कोणीतरी घरून भाजी आणत. १० वी तील एक मुलगी एकदा मकर संक्रांतीला सकाळीच आली. चक्क ९ वारी साडी घालून मी आणि आजी चुलीसमोर चहा पित बसलो होतो. आजीने तिला माझ्या पाया पडायला सांगितले.

पाया पडल्यावर ती लाजून पळून गेली घरी. आजी मात्र नंदाच्या त्या पाठमोरी मुलीकडे पाहून खूप खळाखळा हसत होती. नंदाची कशी फजिती झाली होती. तिने आज साडी घातली होती. त्यामुळे आजीच्या अंदाजाप्रमाणे तिचे लग्न लवकर ठरवतील म्हटली. आजीचा अंदाज खरा ठरला.

आजीच्या विठाईचे लग्न ठरवावे असा ती विचार करू लागली. मे महिन्याच्या सुट्टीत मला नाही, येता आले त्या लग्नाला. जूनच्या पहिल्याच आठवडयात मी रूजू झालो. मला भेटायला विठाई आली होती. आईकडे म्हणजेच माझ्या आजीकडे. १४-१५ वर्षांची विठाईने सुद्धा ९ वारी साडी घातली होती. मला नमस्कार करताना नेहमी खेळकर आणि पोलके परकर घालणारी आजीची लाडकी लेक निष्कारण प्रौढ भासू लागली. सर तुम्ही लग्नाला

यायला पाहिजे होते म्हणाली पण आजपर्यंत कधीही माझ्यापुढे न लाजणारी विठा आज मात्र काहीच बोलत नव्हती. डोळ्यांतून तिच्या अश्रू आलेले मला स्पष्ट दिसत होते.

आजी सांगत होती. सर तुम्हाला म्हणून ती भेटायला आली. लगेच जाणार आहे सासरी. ५ मैलांवरच वस्ती आहे. आर्वी रोडवर. ३-४ एकर विहीर बागायत आहे. करील कष्ट आणि उभारील तिचा संसार.

जूनमध्ये मी एमएस्सी साठी पुण्यात जायचे ठरवले. त्यामुळे हायस्कूल सोडावे लागणार होते. सर्व विदयार्थी हळहळ करीत होते. मला सावरगावमधील शेवटचा दिवस चांगला आठवतोय. शाळेचा निरोप समारंभ संपून शनिवार असल्याने दुपारच्या जेवायला मी आजीकडे आलो होतो. माझ्या आधीच आजीचे घर विदयार्थी-विदयार्थीनींनी भरले होते. प्रत्येकाच्या हातात काहीतरी होते. गुलाबाचे फूल कोणी देत होते तर कोणी पेन. सावरगावच्या विदयार्थ्यांची त्यावेळची सरांना गिफ्ट देण्याची कल्पना काय असावी? स्टीलचे पेले-ग्लास त्यांनी दुकानातून विकत आणले होते. आजी एका कोपऱ्यात उभी मांडी घालून रडत होती.

तिचे 'सर' तिच्यापासून दूर जाणार होते. सख्ख्या मुलांवरही एवढे प्रेम माया जिव्हाळा जिने लावला नसेल तेवढा एका नात्यागोत्याच्या नसणाऱ्या मुलाला तिने लावला होता.

माझ्या आठवणीच्या हया शिदोरीत काय नव्हते? देवकर आजीची निरागस माया, अतूट जिव्हाळा, विठाईचे नाजूक स्नेहबंधन तिच्या तीनही मुलांचे माझ्याशी असलेले भावपूर्ण संबंध. मच्छिंद्रचे सुधारित शालेय शिक्षण त्याच्या बहिणीची चंद्रभागेची सतत वाहणारी नितळ प्रेमाची धार. सगळं सगळं होतं त्या शिदोरीत. मला आईची आठवण झाली पूर्वी शाळेत असताना सहलीला जाताना ती पांढऱ्या स्वच्छ कपडयात गुळाच्या व दुधाच्या दशम्या दयायची. आता मिल्टनच्या डब्यात नसणारी भावस्पर्शता त्या आईच्या धुवून स्वच्छ केलेल्या पांढऱ्या कपडयात गुंडाळलेली असायची. तिची गाठ सोडताना आईची माया एक एक पदर सुटावा तशीच आज देवकर आजीची शिदोरी सोडताना माझी अवस्था झाली. स्थूल देहातील डोळयांच्या अश्रूंनी त्या आजीच्या शिदोरीवर जणू मनस्वी अमृतबिंदूचा नकळत शिडकावा केला होता.

वाघ सरांनी मला भानावर आणले. ५-१० मिनिटांत बस शिवाजीनगरला पोहोचणार होती.

मी अतिशय जड पावलाने पायऱ्या उतरत होतो. काय होते माझे देवकर आजीशी ऋणानुबंध?

Soulmate ची कल्पना मी अभ्यासली आहे. परंतु या वेगळ्याच अतूट नात्याबद्दलचे कोडे अजूनही मला उलगडले नाही.

- - - - - - - - -

# सप्तश्रृंगी देवीची कृपा

आज नवरात्रीची सातवी माळ होती. पण यावर्षी सार्वजनिक उत्सवाला कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे बंदी होती. आम्ही सूरतला असताना तीनही वर्षे नवरात्र उत्सव धुमधडाक्यात साजरा करत होतो. चेतन व केतन दोघे पण सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रतिनिधी व मी सर्व नियोजन करीत असू. संध्याकाळची आरती व गरबा सगळे एकत्र येऊन करायचे. जळगावला असताना गुजराथी मंडळाच्या नवरात्रात उत्सवाचे यजमानपद त्यांनी आमच्या शाखेला दिल्याने आरती आम्ही सर्व स्टाफने खूप उत्साहात केली होती. सगळे प्रसंग चलत चित्रपटासारखे क्षणार्धात डोळयासमोरून गेले. त्यात मन अडकले ते येवल्याच्या १९८४ च्या नवरात्री उत्सवातील ७ व्या माळेच्या घटनेने.

सकाळचे ७-७॥ वाजले असावेत. आज रविवार होता. बाहेर जीप थांबण्याचा आवाज आला. बनकर नेहमी यायचे. १९७२ च्या दुष्काळात आण्णा म्हणजे अंबादास बनकर बँकेच्या कामानिमित्त दुष्काळी कामावर जात असे. आज ते एक प्रथितयश रेल्वेचे कंत्राटदार होते. राजकारणात बऱ्यापैकी जम बसला होता. त्यांनी बाहेरूनच आवाज दिला.

''तयार आहे का?''

मी बाहेर आलो. आण्णा धावत आले. जीप लावली होती. आपल्याला लगेच वणीच्या देवीला जायचे. पाच मिनिटांत तयार व्हा. जीपमध्ये परमपूज्य अमळनेरकर महाराज आहेत म्हटले व त्याच्या धाकटया भावाचे नुकतेच लग्न झाले होते. ते जोडपे होते. माझी आंघोळ झाली होती. त्यामुळे मी खरोखरच तयार झालो. त्यांनी सौ. शोभाला आग्रह केला. ताई त्यावेळी २ वर्षांची होती व प्रसाद ४-४॥ वर्षांचा. त्यामुळे असे लगेच निघता येणे तिला शक्य नव्हते. आण्णाने प्रसादला घ्या मग. म्हटले. तिने प्रसादची तयारी केली व आम्ही जीपमध्ये बसलो. आण्णा स्वतः जीप चालावयाला बसले होते.

आण्णाला नाही कसे म्हणणार होतो. त्यावेळी ते कृषिउत्पन्न समितीचे सभापती व जिल्हा बॅंकेचे संचालक होते. पुढे ते एका टर्ममध्ये चेअरमन पण झाले होते. कधी कधी पाटोदा शाखेत काम असेल तर ९-९.३० लाच घरी यायचे. मी जेवायला बसलेलो असेल तर सौ. त्यांना माझ्याबरोबर जेवायला बसा म्हणायची. पांढरेशुभ्र इस्त्रीचे कपडे असुनसुद्धा आण्णा आमच्या त्या लहानशा जागेत चक्क मांडी घालून जेवायला बसायचे. त्यांनी जेव्हा जेव्हा नवीन विहीरीचे काम केले त्यावेळी मला हमखास

नेलेले आहे. पाणी लागले की पुजेला चला म्हणायचे. एकदा आण्णा बरोबर बोअरचे मशिन पहायला आम्ही हैद्राबादला गेलो होतो. बॅकेमुळे संबंध येतात पण कधी कधी नकळत मैत्री होते. जीवाभावाचे संबंध तयार होतात. त्याचे व्यवसायावर कामावर काय परिणाम होतात याचा मी चिकित्सक बुद्धीने कधी विचार केला नाही. पण असे मैत्रीचे संबंध मात्र जपलेत आणि म्हणूनच आजपर्यंत ते आवर्जून जपलेतही म्हणून त्यादिवशी आण्णाबरोबर निघालो. प्रसादला बसायला मोकळी जागा दिली. त्याला लहानपणापासूनच बाहेर फिरण्याची आवड यामुळेच निर्माण झाली होती.

आण्णांनी किर्तनकार अंमळनेर महाराजांची ओळख करून दिली. ते कालच अंगणगावला घरी आले होते व सकाळीच वणीच्या देवीला जाऊ या म्हटले. तुमची आठवण झाली. येत असाल तर घेऊन जाऊ म्हटले. त्यावेळी मोबाईल नव्हते व माझ्या येवल्याच्या घरात फोन पण नव्हता. त्यामुळे अगोदर सूचना तरी कशी दयायची म्हणून डायरेक्ट घरीच आलो. आण्णा जीप चालवता चालवता सांगू लागले. खरे म्हणजे आण्णाचा धाकटा भाऊ पण होता. नंतर त्याने जीप चालविली व मग आमच्या तिघांच्या गप्पा चालू झाल्या. मी स्वाध्यायाच्या चिंतनिकेला जात असे व पाटोदा परिसरात काही प्रवचने पण केली होती. आण्णाला

याची कल्पना होती. महाराजांबरोबर संतवाङ्मयावर चर्चा चांगलीच रंगली. मी त्यावेळी ज्ञानेश्वरी वाचत असे.

चांदवडच्या रस्त्याला लागलो व आण्णांनी चहा घेण्यासाठी जीप थांबवली. प्रसादला हवेच्या झुळक्याने झोप लागली होती. आण्णांची धाकटी वहिनी व प्रसाद जीपमध्येच थांबले.

महाराजांनी दूध घेतले व आम्ही तिघांनी मसालेदार कडक चहा घेतला व पुन्हा जीपमध्येच बसलो. पूर्वी मी, चिनावले व होनराव असेच एकदा फॅमिलीसह देवीला आलो होतो. त्यावेळी दिंडोरीला थांबलो होतो. त्यावेळी स्वामी समर्थ केंद्राचे प्रमुख तीर्थरूप आण्णा महाराज मोरे यांच्याकडे थांबलो होतो. कारण होनरावची व त्यांची कोपरगावी ओळख होती. मी आण्णाला व महाराजांना तो किस्सा सांगितला. श्री. मोरे आण्णांनी आम्हाला देवीला पुरण पोळीचा नैवेदय दाखवायला आवर्जून सांगितला होता. जातानाच थांबून नैवेदयापुरती पुरणपोळी घेऊन जा. त्या घराचा पत्ता व नाव पण मोरे आण्णांनी आम्हाला सांगितले होते. बनकर आण्णांनी आपणही घेऊन जाऊ नैवेदय म्हटले.

आता रस्त्यावर वाहनांची गर्दी वाढत होती. कारण आता वणीचा एकेरी रस्ता चालू झाला होता. सातवी माळ असल्याने

जाणाऱ्यांची गर्दी अपेक्षित होती. बोलता बोलता देवीच्या पायथ्याजवळ आलो. जीप लावून पायऱ्यांनी वर देवीच्या गाभाऱ्याकडे जायचे होते. आण्णांनी त्यांच्या धाकटया भावाला जीप पार्किंग करायला सांगितले. पार्किंगची जागा पूर्णपणे भरली होती. थोडे लांब जावून कमलाकरने जीप पार्किंग केली. आम्ही एका पुजाऱ्याकडून पुरणपोळीचा नैवेदय करून घेतला व निघालो.

मला प्रसादला कडेवर घ्यावे लागले कारण तुफान गर्दी होती. एक एक पायरी ओलांडायला वेळ लागायचा. आम्ही सर्व बरोबरच होतो. महाराज पण हळूहळू चालत होते. समजा जाताना बरोबर नसलो तर कोप-यातील हाॅटेलजवळ भेटू असे ठरवून आम्ही चालू लागलो. देवीच्या सभोवतालचा परिसर हिरव्यागार दाट झाडांनी व्यापला होता. निसर्गाच्या सान्निध्यात देवीला प्रसन्नता लाभत असावी. येतानांचे जातानांचे यात्रेकरू माकडांना खायला देत होते. प्रसादला ते पाहताना मजा वाटत होती. आण्णांनी एक फुटाण्याची पुडी प्रसादकडे दिली व माकडांना दे म्हटले पण त्याला गर्दीत खाली उतरविणे शक्यच नव्हते. त्यानी त्यातील फुटाणे दूर दूर फेकले. माकडांनी ते अलगद घेतले. प्रसाद इतकी माकडे व त्यांची मजा पहिल्यांदाच पाहात होता. त्याला आणण्याचा हेतू यामुळे तरी सफल झाला म्हणायचा.

शेवटी देवीच्या गाभा-यात आम्ही कसेबसे गर्दीत शिरलो; प्रसादला कडेवर ठेवून चालणे शक्य नव्हते. नव्या जोडप्याने नैवेदय पुजा-याकडे दिला. या गर्दीत महाराज व आण्णा मात्र दिसत नव्हते. गाभारा लहान व गर्दी इतकी की पाऊल ठेवायला पण जागा नव्हती. देवीपुढे जाऊन आम्ही दोघांनी नमस्कार केला. तोपर्यंत प्रसादचे बोट मी धरले होते. पण नंतर ते कसे सुटले हे लक्षातच आले नाही. परतीच्या मार्गाकडे दाराकडे चाललो होतो. पण प्रसाद दिसत नव्हता. मी प्रसाद प्रसाद असा ओरडत होतो. २-३ मिनिटे जोरजोरात त्याला हाका मारत होतो. पोटात धस्स झाले. डोळयात पाणी आल्याने आवाजही निघेना. एवढया गर्दीत आता त्याला कसे शोधायचे व तो मिळेपर्यंत बाहेर तरी कसे पडायचे? मी पूर्ण गर्भगळीत झालो होतो. तेवढयात पप्पा पप्पा असा प्रसादचा आवाज मी ओळखला पण तो काही दिसेना. माझी व त्याचीही त्यावेळची आर्तता मला अजूनही चांगले आठवते. आता वाटते आईवडील व मुले यांची ही आर्तता आयुष्यभर टिकावी. जगण्याला उमेद देते ती. तेवढयात एकाने प्रसादला उंच केले व हे बाळ कोणाचे आहे? असे विचारले.

प्रसाद 'पप्पा पप्पा' म्हणत होता व रडत होता. कावराबावरा चेहरा झाला होता. माझ्या जीवात जीव आला. देवीचा नवचंडी यज्ञ व होम करतानाची प्रार्थना मला आठवली. पण प्रसाद पर्यंत

जाण्याइतका रस्ता मला सापडत नव्हता. जागा खूप अरुंद होती. त्या माणसाने मला खूण केली. दाराजवळ या म्हटले मी पण हळूहळू दाराकडे निघालो. पाच मिनिटांचे अंतर पण जणू तासाचे भासले. त्याने प्रसादला माझ्याजवळ एवढया गर्दीत ताब्यात दिले व या गर्दीत बाळांना असे एकटे कसे सोडता असा सज्जड पण प्रेमाचा दम भरला. मी प्रसादला घट्ट मिठी मारली. त्याला हे कळण्याचे त्याचे वय नव्हते. पण आपण दोघे चुकलो होतो व आपली भेट होत नव्हती. तोपर्यंत तो पण चांगलाच घाबरलेला दिसत होता. मी गाभाऱ्याच्या बाहेर आलो. अण्णा महाराज कुठे आहेत हेही त्यावेळी पाहावे हे सुचले नाही इतका मी प्रसादच्या विचारांनीच गुंग झालो होतो. प्रसादला घट्ट धरून मी पायऱ्या उतरू लागलो. प्रसाद सापडला नसता त्यावेळी तर मी काय केले असते? हा एकच विचार आजही मला अस्वस्थ करतो.

हळूहळू पायऱ्या उतरायला गर्दीमुळे खूप वेळ लागला. दुकानांच्या गर्दीतून वाट काढीत आम्ही दोघे पुढे पुढे चालत राहिलो तेवढयात आण्णा व महाराज दिसले. आण्णांना जे झाले ते सांगितले. आण्णांनी प्रसादला कडेवर घेतले म्हणजे खांदयावर घेतले व आम्ही सगळेच चालू लागलो. कोपऱ्याच्या मोठया हॉटेलमध्ये आण्णांचा धाकटा भाऊ उभा होता. तो त्याच्या पत्नीची म्हणजे आण्णाच्या धाकटया वहिनीची वाट पाहात होता. त्यांचीही

चूकमूक झाली होती. आण्णा पण ह्या गर्दीत झालेल्या ह्या दोघांच्या चुकीमुकीने अस्वस्थ झाल्याचे जाणवले. आम्ही सगळे इथेच थांबतो. तू पाहून ये असे त्यांनी भावाला सांगितले. महाराज मी प्रसाद आण्णा एका टेबलावर एकत्र बसलो. आण्णांनी घरून जेवण करून आणले होते. मी म्हटले ते दोघे आल्यावरच घेऊ. तोपर्यंत प्रसादला चांगलीच भूक लागली होती. आण्णानी महाराज व प्रसादला हॉटेलवाल्यांकडून प्लेट घेऊन घरची पोळी भाजी वाढली व गरम जिलेबी करायला सांगितली. प्रसादला लहानपणापासून गोड आवडत असे. आपण चुकलो होतो हे तो विसरला होता. तेवढयात कमलाकर परत आला पण त्याची पत्नी म्हणजे झांबरेची मुलगी सौ. कुसुम त्याच्यासोबत नव्हती. आता मात्र आम्ही सगळेच घाबरलो होतो. आमचे हे बोलणे हॉटेलवाल्या मालकाने ऐकले. तो म्हटला एक २०-२२ वर्षाची हिरवी साडी घातलेली नव्या नवरी सारखी मुलगी इथे आली होती पण कोणीच दिसेना. म्हणून परत शोधायला गेली आम्हाला किती धीर आला. आण्णा स्वतः प्रत्येक हॉटेलमध्ये शोध घ्यायला लागले होते. जवळच्या हॉटेलमध्ये कुसुम एका खुर्चीत मान खाली घालून बसली होती. आण्णाने तिला हाक मारली व ते दोघे आमच्याकडे आले. कुसुमला खात्री होती की आम्ही येणार म्हणून तिने जागा सोडली नाही पण तिची हॉटेलची जागा चुकली होती. लग्नानंतर बाहेर

पडण्याची तिची ही पहिलीच वेळ वडिलांबरोबर जास्तीत जास्त येवला किंवा नाशिक पर्यंत ती जायची. ती वयाने तशी लहानच होती. १८-१९ वर्षांची असेल.

आता सगळे एकत्र जेवायला बसलो. आण्णाच्या आईने व पत्नीने छान शिदोरी दिली होती. घरचे लोणचे होते. लसणाची चटणी होती. मोकळे पिठले होते. काही भाकरी व काही चपाती व कांदा पण होता. आण्णांनी पुन्हा एकदा सगळ्यांना गरम जिलेबी करायची ऑर्डर सोडली. सायंकाळ झाली होती. घरी जायला २-२।। तास तरी लागणार होते. सगळ्यांनी पुन्हा एकदा इथूनच देवीचे दर्शन घेतले व तिच्या कृपेमुळेच एवढया गर्दीतही आम्ही सगळे पुन्हा भेटलो. याबद्दल मनापासून देवीच्या कृपेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून जीपमध्ये बसलो. आधी अंगणगावला जीप थांबली व आण्णाचा दुसरा भाऊ मोहन याला आम्हाला येवल्याला घरी सोडायला सांगितले. घरी आल्यावर सगळा किस्सा सांगितला.

सौ. शोभाने प्रसादला घट्ट मिठी मारली. ताई लहान होती. तिला आम्ही यात्रेतून आणलेला प्रसाद व खाऊ दिला. प्रसाद व ती खेळत बसली. मी त्या दोघांकडे पाहून हसावे की रडावे या विचाराने शांत बसलो. आजही हा ३५-३६ वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला की अंगावर काटे उभे राहतात.

# “मी हरलो
# तो जिंकला”

मी सूरतला असताना नवरात्रीत देवीच्या मंदिरात पूजेला जायचो. आमचा शिपाई दवे हा त्या पुजा-यातील घरापैकी एक होता. त्यावेळी तो आम्हाला घरी नेऊन आरतीचा मान देत असे. आरती झाल्यानंतर त्याच्या घरी थांबायचो. त्यावेळी त्यांनी सांगितलेला किस्सा ऐकून मी तर भांबावून गेलो.

दवे मूळचे नंदूरबारचे. मंदिर पण खूप जुने. ही चौथी-पाचवी पिढी असेल. ते देवीचे पुजारीचे पद सांभाळतात. हे सगळे खाजगी मंदीर असल्याने नवरात्रीत जमा होणारा पैसा कुटुंबातच राहत असे. त्यात ही ३ कुटुंबे होती. पैशांवरून वाद चालू झाले. पैकी आमचा शिपाई असलेला दवे व्यसनाधीन झाला. त्याच्याबरोबर अजून एक कुटुंब व्यसनाधीन झाल्याने नवरात्रीत जमा होणा-या पैशांवरून भांडणे विकोपाला गेली. कोर्टाची पायरी एका कुटुंबाने चढल्याने आता दरवर्षी एकाच कुटुंबाला हे यजमानपद मिळाले. दोन कुटुंबे व्यसनामुळे पैसे मिळूनही अधोगतीकडे वाटचाल करू लागले. दवेंनी मसालेदार दूध आम्हाला दिले व ते आम्ही दूध घेता घेता हे

सगळे ऐकत होतो. दवे तर चांगली बँकेची नोकरी सोडून मधून मधून दांडी मारत असे. हे सगळे पाहून मन विषण्ण झाले. मी व श्री. काळकर साहेब आमच्या निवासस्थानाकडे आलो. मी त्यावेळी एकटाच होतो. मला मी पुण्याला २००४ ला असतांना सेवाशाखेत असतांना लक्ष्मण शिपायाच्या बाबतीत झालेली घटना माझ्या डोळयासमोर आली.

लक्ष्मणची एका गजबजलेल्या शाखेतून आमच्या शाखेत बदली झाली. कारण तिथे त्याच्या रजेमुळे व ग्राहकांची नेहमी गर्दी असल्याने त्याची बदली आमच्या शाखेत केली. कारण आमच्याकडे ग्राहक नसत. सततच्या रजेमुळे त्यांच्या हक्काच्या रजा संपल्या होत्या व नंतर विनापगार रजा (Loss of Pay) चालू झाल्या होत्या.

जर एकूण अशा बिनपगारी रजा १८० दिवस झाले तर त्या कर्मचा-याला रितशीर ३ नोटीसा देऊन कामावरून काढून टाकण्याची तरतूद नियमात आहे.

मी लक्ष्मण ज्या दिवशी रूजू झाला त्या दिवशीच हयाची त्याला कल्पना दिली. तुझे १८० दिवस पुरे व्हायला १५-१६ दिवसच शिल्लक आहेत. त्यामुळे तू अशा रजा घेऊ नकोस हे सांगितले. त्यावेळी त्यानी हे सगळे चांगले ऐकून घेतले. मी त्याला

तुझ्या दारूच्या व्यसनामुळे कामावर येण्याला काहीही अडचण येणार नाही याची काळजी घे. हे सांगताना त्याचा हितचिंतक व आमच्या शाखेचा श्री. जोगळेकर त्याच्या बरोबर होता.

जानेवारी २००५ आला व सुरुवातीच्या काही महिने अतिशय नियमित येणारा लक्ष्मण पुन्हा न सांगता रजा घेऊ लागला. त्याच्या बाबतीत शाखेला वरिष्ठ कार्यालयाकडून सक्त ताकिद आली होती. तरीही मी त्याच्या अशा रजा किरकोळ रजेतून किंवा अर्जित रजेतून नोंद करीत गेलो. त्याला नंतर मेडिकल सर्टिफिकेट आणायला सांगत असे. तो नाईलाजाने ते देत असे. मला एकदा म्हटला सुद्धा मला प्रत्येक वेळी डॉक्टरांना फी द्यावी लागती.

दोन महिने गेले त्याचे रजा घेण्याचे प्रमाण काही कमी झाले नाही. २००५ च्या रजा संपल्या होत्या. त्याने एकूण Medical leave ची मर्यादा २ वर्षांपूर्वीच संपवली होती. ती रजा सुद्धा आता कितीही गंभीर आजार असला तरी ती बिनपगारी होणार होती.

मधून मधून तो कामावर येत असे. त्यामुळे मलाही बरे वाटायचे. पण पगाराच्या दिवशी तो पगार घेतला की दुस-या दिवशी कमीत कमी एक दिवस तरी हमखास रजा घेत असे. असाच एक दिवस तो आला नाही. जोगळेकर केबीनमध्ये आले व आपण दोघे त्याच्या घरी जाऊन पाहू तो आहे का व काय करतो ते पाहू या

म्हटला. आमची शाखा Cheque clearing चे मुख्य काम करत असल्याने सकाळी ७.३० लाच कामकाज चालू होत असे. सर्व शाखांमधून आलेल्या चेकचे बँकेप्रमाणे वर्गीकरण करून हे सगळे काम १-१.५ तासांत करावे लागे व ते पूर्ण झाले की, आम्ही सगळे निःश्वास सोडत होतो. हे नित्याचे असले तरी रोज यांत लक्ष घालावे लागे. सकाळचे ९.०० वाजले होते व जोगळेकरांबरोबर मी जायचे ठरवले.

जोगळेकरांनी त्याची बजाज मोटार सायकल काढली व आम्ही दोघे लक्ष्मणच्या घरी जायला निघालो. पत्ता जोगळेकरांना माहित होता. तरी एका छोटया टपरीवाल्या दुकानात जोगळेकरांनी लक्ष्मणच्या घराची चौकशी केली. त्या दुकानाच्या शेजारील बोळीतच लक्ष्मणचे दोन खोल्यांचे घर होते. सगळया छोटया छोटया पत्र्यांच्या घराचा तो एक समूह होता. दार उघडेच होते. बेलचा प्रश्नच नव्हता. कारण घराला बेल नव्हती. आधी जोगळेकर घरात गेले. लक्ष्मणची पत्नी बाहेर आली. जोगळेकरांनी साहेबपण आलेत सांगितले. एक लोखंडी कॉट होती. त्यावर सगळे कपडे तिने व्यवस्थित केले व आम्हाला दोघांना बसायला जागा केली.

ते तर सकाळीच डबा घेऊन गेले म्हटली.

बँकेत तर आले नाही, जोगळेकरांनी सांगितले.

त्यांना एक लहान मुलगा होता. ३ वर्षांचा असेल व एक १४-१५ वर्षांची मुलगी होती. तिला शाळेत जाण्याची लगबग होती. छोटा मुलगा झोपेतून नुकताच उठला होता.

मी पाहून येऊ का? तिने विचारले. तुम्हाला ५-१० मिनिटे थांबावे लागेल.

ठीक आहे. लवकर या. तो नसेल तर जास्त पाहू नका. मी तिला सांगितले. तिने चहा आता करू की आल्यावर असे जोगळेकरांकडे पाहून विचारले.

‘‘नंतर’’ असे जोगळेकरांनी सांगितल्यावर ती निघाली.

आम्ही दोघे व त्याची मुलगी व छोटा मुलगा घरी होतो. आम्हाला पाहून एक-दोन महिला घरात आल्या. त्या ‘‘शेजारीच राहत असाव्यात. त्यांनी कुटुंबाची माहिती पुरवली. बिनपगारी रजेमुळे या बाईचे खूप हाल चाललेत. कधी कधी भावाकडे जाऊन किराणा भरावा लागतो. भाऊ पण यांच्या व्यसनाला कंटाळला आहे असे त्या दोघींनी आम्हाला सांगितले.

तेवढयात लक्ष्मणला बरोबर घेऊन त्याची पत्नी आली. त्या शेजारच्या बायकांनी अलगद घरातून पळ काढला. ‘‘लक्ष्मण त्याच्या २-३ मित्रांबरोबर गेला होता’’ त्याच्या बायकोने सांगितले.

लक्ष्मण मात्र खाली मान घालून कोप-यात उभा होता.

सकाळीच तू घेऊन तर आला नाही ना? जोगळेकरांनी खडसावून विचारले.

'नाही.' लक्ष्मण हळूच पुटपुटला. मग डबा घेऊन बँकेत यायचे सोडून मित्रांकडे जाऊन कसा बसला?

मला बँकेत यायची भिती वाटते. सगळे बोलतील, रागावतील असे सारखे वाटते म्हणून आज त्या विचाराने निघालो; पण यायची हिंमत झाली नाही.

त्याच्या बायकोने आम्हाला चहा ठेवला. चहा तिनेच आणला. चहा दिल्यावर तुम्हीच सांगा यांना म्हटली. पोरगीचे २-३ वर्षांनी लग्न करावे लागेल. त्यावेळी कुठून पैसा आणायचा? व असेच चालू राहिले तर स्थळ तरी कसे मिळेल? सांगा ती रडकुंडीला येऊन सांगू लागली. सुदैवाने मुलगी केव्हाच शाळेत गेली होती. छोटा मुलगा बापाजवळ म्हणजे लक्ष्मणजवळ रडत रडत गेला होता. त्याला लक्ष्मणने कडेवर घेतले होते.

लक्ष्मण अरे तू काय विचार करतो, बँकेत अशा दांडया मारल्यावर तुझी नोकरी जाईल.

ती केव्हाच गेली असती. साहेबांनी वेळोवेळी तुला वाचविले. आता सगळया रजा संपल्यात. आजची रजा बिनपगारी

होईल. १८० दिवस पण पूर्ण झालेत. वरिष्ठ कार्यालय तुझ्या रजेचा अहवाल वेळोवेळी मागते.

जोगळेकरांनी लक्ष्मण व त्याच्या बायकोकडे पाहून स्पष्ट केले.

मी उद्या येईल कामावर- लक्ष्मणने हळूच सांगितले. मान वर करण्याचे त्याचे नैतिक धैर्य नव्हते.

नंतर दांडी मारल्यावर मात्र कारवाई करावी लागेल. जोगळेकरांनी घरातून उठताना त्याला सांगितले व आम्ही दोघे बँकेत आलो.

दुस-या दिवशी तो कामावर आला. तो जर चांगला व्यवस्थित असला की काम पण मन लावून करत असे. त्याचे काम इतर शिपायांच्या तुलनेत कितीतरी उजवे होते. तो ब-याच वेळा कडक इस्त्रीचा पांढरा युनिफॉर्म घालत असे. त्यामुळे बाहेरच्या बँकेत जायची कामे त्याला सांगितली जायची. त्याची तक्रार इतरांकडून कधीच येत नसे.

असे बरेच दिवस चांगले चालले होते. कमीत कमी कामावर तरी नियमित येत असे. मला वाटले आता त्याची बिनपगारी रजा होणार नाही. पण शेवटी पगाराचा दिवस आला.

सगळा स्टाफ म्हटला की, उद्या लक्ष्मण हमखास दांडी मारणार. जोगळेकरला व मला मात्र तो तसे करणार नाही अशी आशा होती.

पण झाले उलटेच. फक्त एक दिवस मध्ये गेला. यावेळी त्याने रजा घेतली नसल्याने पगार पूर्ण मिळाला होता. दोन दिवस गेले व पुन्हा पाहतो तर लक्ष्मणची दांडी. सूचना नाही, अर्ज नाही. सौ. दिपा म्हटली, ‘‘साहेब आता जास्त मागे लागू नका’’ तरीही मी ३ दिवस सतत न आल्याने जोगळेकरांना घरी पाठवले. लक्ष्मणची व त्यांची भेट झाली नाही. पण त्याने घरी सक्त ताकिद दिली. त्याचा परिणाम तो कामावर येण्यात झाला.

मला झोनल ऑफिसचे पत्र आले. त्याला रितशीर नोटीस देण्याचा तो आदेश होता. नोटीसची प्रत पण सोबत होती. मला त्याची अंमलबजावणी करणे भाग होते. ती नोटीस त्याला २-३ दिवसांनी बजावली. त्याचा विपरीत परिणाम झाला. त्याने पुन्हा दांडी मारायला सुरुवात केली. तो व्यसनाधीन होत चालला होता.

मी झोनल ऑफिसच्या कार्मिक विभागांच्या मुख्य अधिकारी श्री. कुलकर्णी यांना फोन केला. ते मी बडोद्याला ट्रेनिंग सेंटरला असताना हेड ऑफिसच्या विभागात होते. त्यामुळे ओळख होती. मी त्यांनी नाही म्हटले तरी शिफारस करून एक पत्र लिहिले व त्याला नियमित सेवेत घ्या. त्याच्या कामाची

ऑफिसच्या वागणुकीची शिफारस केली, त्याचा थोडा चांगला परिणाम झाला. त्याच्यावरची कारवाई वरिष्ठ कार्यालयाने थांबवली.

परंतु यानंतर काय? लक्ष्मण जर कामावर एक दिवस जरी आला नाही तर काय? माझ्यापुढे यक्ष प्रश्न होता. त्याला जोगळेकरला पण हे सहन होईना. काही दिवस सुरळीत गेले. मी ही लक्ष्मणचे प्रकरण विसरलो होतो.

पण लक्ष्मणने पुन्हा दगा दिला. पगार घेऊन दुस-याच दिवशी त्याने दांडी मारली. ती रजा आता बिनपगारी होणार होती व मला तसे कळविणे भाग होते. “आज आपण दोघेही जाऊन शेवटचा प्रयत्न करू या’’ जोगळेकरांनी माझ्याकडे येऊन मला विनंती केली. माझ्यातली माणुसकी पुन्हा जागी झाली. मी त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला व त्याच्या घरी दोघे आलो.

आज दरवाजा बंद होता. बाहेरची काही महिला मंडळी आली. त्यांनी बाहेरून हाका मारल्या. दोघेही आतच आहेत असे एका महिलेने सांगितले.

ब-याच वेळाने त्याच्या पत्नीने दार उघडले. साडी सावरत केस आवरत तिने आत या म्हटले. लक्ष्मण कॉटवर पडला होता. त्याने झोपेचे सोंग घेतले होते हे लगेच समजले. जोगळेकरांनी

त्याच्या अंगावरचे पांघरूण ओढले. त्याने थोडी तरी सकाळी घेतली असावी असा अंदाज त्यांना आला. लक्ष्मण उठून बसला होता. एकही शब्द बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हता. त्याचे तसे धैर्य नव्हते. तिने चहाचा आग्रह केला. आम्ही दोघांनीही नाही म्हटले. आम्ही मात्र का आला नाही एवढेच पहायला आलो होतो हे तिला सांगितले व निघालो. गोंदवलेकर महाराजांच्या चरित्रातील घटना आठवली. एक व्यसनाधीन माणूस महाराजांकडे येतो. महाराज त्याला रामाच्या मूर्तीपुढे उभे करतात व रामनाम घ्यायला सांगतात; पण दुस-याच दिवशी तो गायब होतो. रात्रभर बाहेर. पहाटेच महाराज फिरायला बाहेर पडतात तर रस्त्याच्या एका बाजूला तो माणूस व एक स्त्री झोपलेले महाराजांना दिसतात त्यांना थंडी लागू नये म्हणून ते अंगावरची शाल दोघांच्याही अंगावर टाकतात रामाला म्हणतात "रामराया" यापेक्षा मी काय करणार? मला ही घटना पाहून शेवटी मला त्याच्या रजेचा अहवाल वरिष्ठांना कळवावा लागला. ताकिद देऊनही ३ वेळा त्याने बिनपगारी रजा घेतली होती. त्याची १८० दिवसांची रजा केव्हाच संपली होती. मेडिकल रजा तर शिल्लकच नव्हती. काही दिवसांनी झोनल ऑफिसचे पत्र आले व त्याच्या नावे बंद पाकिट आले. मी दुस-या एका शिपायाला घरी जाऊन त्याला यायला सांगितले.

२-३ दिवसांनी दोघे नवरा बायको शाखेत आले. सकाळची १० ची वेळ असावी. दोघेही केबीनमध्ये आले. शाखेच्या पत्रावर लक्ष्मणची सही घेतली व बंद पाकिट लक्ष्मणला दिले. मी निःशब्द होतो. यावेळी काहीही बोललो नाही. दोघे केबीनच्या बाहेर पडले. दिपा आत आली होती. मी माझ्या नेहमीच्या खुर्चीतून उठून समोरच्या खुर्चीत बसलो हे तिने पाहिले. तुम्ही का रडता साहेब? यात तुमचा काहीही दोष नाही असे म्हणून ती बाहेर पडणार -

मी फक्त इतकेच म्हणालो,

दिपा आज पहिल्यांदाच मी हरलो व लक्ष्मण जिंकला.

मी दिपा त्या जोडप्याला बाहेर येऊन जे म्हणाली ते मी स्पष्ट ऐकत होतो.

तुला कामावरून काढून टाकले, तू मात्र आनंदाने घरी चाललास; पण लक्ष्मण आत जाऊन पहा- साहेबांना अश्रू आवरत नाहीत.

२-३ महिन्यांनी मी स्वारगेटवरून रिक्षाने मार्केटयार्डच्या दिशेने चाललो होतो. तेवढयात लक्ष्मण दिसला. चहाची हातगाडी टाकली होती त्याने. मी थांबलो थोडा वेळ. म्हटले लक्ष्मण हे काय?

हातची सरकारी नोकरी घालवून बसलास आणि आता काय आयुष्यभर चहा विकत बसणार का?

मी दोनच मिनिटे खाली उतरलो. त्याने तेवढयातही भर रस्त्यावर माझे पाय धरले होते.

मी म्हटले लक्ष्मण खूप उशीर झालाय आता.

त्याच्या या नव्या व्यवसायाला सुयश चिंतून मी रिक्षात बसलो. संधी येऊनही माणसे अशी का वागतात? हे अतर्क्य कोडे मला आजही उमगले नाही. त्याला साथ देणारा व मला याबाबत प्रोत्साहन देणारा जोगळेकर सुद्धा आजाराशी झुंज देता देता अपयशी ठरला होता.

मी शाखेत पोहोचलो होतो. लक्ष्मणाचा विचार आता यापुढे करावा लागणार नव्हता. खुर्चीवर बसता बसता मी एकच वाक्य पुटपुटलो, “मी हरलो रे लक्ष्मणा तू जिंकलास!”

# कळत-नकळत

सकाळची सातची वेळ असावी, येवल्याला सरोदेंच्या घराकडे लवकर जायला हवे होते. कोणत्याही क्षणी त्यांचे पोस्ट मार्टेम होऊन पार्थिव घराकडे येईल असा निरोप आला होता. मी घाईघाईने निघालो खरा; पण जड पाऊलांनी चाललो होतो. मन अजिबात शांत नव्हते. नेहमीचाच पाच मिनिटांचा रस्ता होता माझ्या घरापासून पण आज तोही लांब वाटू लागला होता. रात्रीच सगळे समजले होते. येवल्याला आल्यापासून ज्यांची माझी सारखी भेट व्हायची असे माझे मित्र अतिशय तरुण वयात मृत्यूला सामोरे का गेले ह्याचा विचार सारखा चालू होता.

शेवटी घर आले. मी पायऱ्या चढणार होतो. माझे जवळचे मित्र समोरच्या पायरीवर बसले होते त्यात गोपाळ चिनावले होते. देशमुख वकिल होते. सर्वांचे चेहरे अतिशय दुःखी होते. हे स्पष्ट जाणवत होते. हे लगेच कळले. मी सरोदेंच्या घरच्या पायरीवर फक्त एकच पाऊल ठेवले होते. समोरून सरोदेंच्या पत्नी सरोदे वहिनींनी साडीचा पदर डोळ्यावरून काढत माझ्याकडे येत होत्या हे समजले.

स्त्री-पुरुष भेद बाजूला सारून जणू एक बहिण-भावाला मिठी मारते असा हंबरडा वहिनींनी फोडला माझ्या गळ्याभोवती मिठी मारून मला जोरजोरात ओरडून विचारत होत्या.

“तुम्ही त्यांच्या सगळ्यात जवळचे ना! तुम्हाला हे सगळे माहीत असताना का नाही आवरले त्यांना सांगा भावोजी...?” त्यांची मिठी सोडण्याचे त्राण माझ्यात नव्हते. त्यांच्या दुःखाला वाट मोकळी करून देण्याशिवाय पर्यायही नव्हता.

आजूबाजूच्या २-३ नातेवाईक महिला जवळ आल्या होत्या. त्यांची समजून घालत होत्या. तेवढयात दवाखान्याची ॲंब्युलन्स गाडी सरोदेंचे पार्थिव घेऊन आली. त्यामुळे भानावर आले. सरोदे वहिनी पण गाडीजवळ आल्या. काल नेहमीप्रमाणे गेलेला आपला पती असा परत आलेला पाहून कोणत्या पत्नीला गहिवरून येणार नाही.

प्रसंग खूपच दुःखद आणि गंभीर होता. यथावकाश सगळा विधी आटोपून सगळे अंत्यसंस्कारासाठी निघाले होते. मी, देशमुख, चिनावले, लहरे तात्या, बनकर अण्णा आम्ही सगळेच बरोबर होतो.

एक वर्षांपूर्वीच ओळख पण मैत्री मात्र ऋणानुबंधाची झाली होती. भेट झाली होती ती बँकेच्या कामानिमित्त. परंतु काम नसले तरी आम्ही भेटत होतो. कधी ते यायचे कधी मी जायचो.

बी. कॉम. नंतर त्यांनी एमबीए केले होते. कोपरगावला खरेदी विक्री संघात ३ वर्षांची प्रशासकीय अधिकारी म्हणून नोकरी केली होती. परंतु गरुडझेप घ्यावी ह्या उमेदीने हा माझा तरुण मित्र स्वतःचे विश्व उभे करावे ह्या ईर्ष्येने पेटून उठला होता.

येवल्याजवळच पारेगावला शिवरामअप्पांची जमीन होती. त्यांना मोबदला दयायला म्हणावी इतकी रक्कम हाताशी नव्हती म्हणून माझ्या या हुशार व्यवहारी मित्राने प्रायव्हेट लिमिटेड कंपनी काढली व शिवराम आप्पाला चेअरमन केले. तिथे दत्त स्वामी या नावाने सिमेंट व टाईल्सची फॅक्टरी उभी करण्यासाठी त्याने जीवाचे रान केले.

बँकेचा कर्जपुरवठा मंजूर झाला होता. त्या दिवशी मी त्यांच्या घरी गेलो होतो. वहिनी त्यांचा भाऊ अनिल, आप्पा सगळे आले होते. मंदिरात पेढे ठेवून आल्यावर सरोदे पण आले. सर्व प्रयत्नांचे सार्थक झाल्याचे त्यांचा हसरा चेहरा सांगत होता.

थोडयाच दिवसांत कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. उदघाटन सोहळा घरगुती पद्धतीत साजरा केला होता. पाहुण्यांची,

नातेवाईकांची गर्दी मात्र लक्ष वेधून घेत होती. उदघाटनाची सांगता कीर्तनाने केली. 'जोडोनिया धन उत्तमे व्यवहार' या तुकोबारायांच्या अभंगावर समयोचित कीर्तन झाले.

कंपनीची घडी बसत चालली होती. ऑर्डर्स येत होत्या. असाच एकदा मी आणि शेखर सरोदे कंपनीच्या कामासाठी कोपरगाव व राहता येथे गेलो होतो. शेखर तसा खूप हौशी. मोटारसायकल तीही रूबाबदार बुलेट. एका व्यापाऱ्याकडे बुलेट लावली. मोटारसायकलपेक्षा जीप न्यावी म्हणून त्या माखाडी व्यापाऱ्याकडे शेखरने तशी जीपसाठी विनंती केली. जीप यायला वेळ लागेल हे कळल्यावर शेखरने मोटारसायकलवर जाण्याचा निर्णय घेतला होता. बाहेर पडल्यावर चांगल्या अस्सल शिव्यांची लाखोली वाहिली त्यांनी व्यापाऱ्याला.

माणसे स्वार्थापुरतीच कृतज्ञ असतात आता आपण इथे अधिकारी नाही म्हणून मूळचा कृतघ्न स्वभाव या व्यापाऱ्याने आपल्याला दाखवला. राहत्यापर्यंतच्या १५-२० मिनिटांच्या प्रवासात त्याने त्या व्यापाऱ्याचा पाणउतारा केला.

काही दिवसांनी बँकेच्या कामानिमित्त आम्हाला दोघांनाही मुंबईला जायचे ठरले होते. अचानक निघायचे ठरल्यामुळे रिझर्वेशन वगैरे केले नव्हते. येवला ते मुंबई प्रवास आम्ही दोघांनी

चक्क ट्रकमध्ये ड्रायव्हरशेजारी बसून केला होता. सकाळी ५ लाच आम्ही मुंबईला उतरलो होतो. त्याचा एक चांदवडचा मित्र डॉक्टर होता. डॉ. वाघ यांच्याकडे सांताक्रूझला राहत होता. दवाखाना व घर शेजारीच होते. कोपरगावच्या उलट अनुभव आला. डॉ. वाघ एका दलित कुटुंबातील. पत्नी पण आयुर्वेद डॉक्टर होती. सांताक्रूझला छोटेखानी दवाखाना थाटला होता. शेखरचे आणि आमचे स्वागत करताना पती-पत्नींची उडालेली तारांबळ अजूनही डोळ्यासमोर होती. शेखर आणि वाघ हे हायस्कूलला एकत्र होते हे समजले. आम्ही सकाळी ९ पर्यंत तयार झालो. ज्यांच्याकडे ऑफिसला जायचं होते त्यांच्या घरी जायचं ठरले व नंतर ऑफिसला. वाघ दांपत्याचे आभार मानून आम्ही निघालेली.

रात्री मात्र आमची दोघांचीही त्या दिवशी येताना अडचण झाली. महाराष्ट्राचे लाडके नेते मा. यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले होते. अख्खी मुंबई हळहळली होती. व्यवहार बंद. दुकाने बंद.

आमचे दोघांचेही यशवंतराव आदरस्थान होते. त्यामुळे मनापासून त्या सगळ्या गैरसोयीचा आम्ही स्वीकार केला होता. काम झाले होते. परतीचा प्रवास सुद्धा आम्ही दुधाच्या टँकरमधून केला.

शेखरची व माझी या दोन प्रवासाची मला आठवण झाली. मनमुराद गप्पा अतिशय स्वच्छ मन मोकळा स्वभाव. खऱ्या मैत्रीला अजून दुसरे काय हवे असते?

असाच एके दिवशी संध्याकाळी मी शेखर सरोदेच्या घरी गेलो होतो. बेल वाजवली. शेखरने दरवाजा उघडायला थोडा वेळ घेतला. यापूर्वी नेहमी दरवाजा उघडाच असायचा की पुढच्या खोलीत सोफ्यावर बसलो. घरात सरोदे वहिनी नसल्याचे जाणवले. तरीही कोणीतरी आत आहे म्हणून शेखरला मी खुणेनेच विचारले. एक अनोळखी तरुण स्त्री लगबगीने बाहेर आली व पुढच्या खोलीतून क्षणार्धात घराबाहेर पडली.

शेखरने दरवाजा बंद केला. त्याचा स्वभाव अतिशय मनमोकळा होता. त्या तरुण स्त्रीचे रहस्य त्याने कोणतेही आढेवेढे न घेता सांगितले. ती समोरच्याच घरात राहात होती. त्याने मला तिच्या पतीविषयी सांगितले. ते इलेक्ट्रिकचे काम करीत होते. बाजारपेठेत त्यांचे दुकान होते. माझी त्यांची थोडीफार ओळख होती.

मला या नवीन संबंधांचा उलगडा होत होता. पण शेखरने त्यात चुकू नये असे त्यावेळी मला वाटले. सरोदे वहिनी अतिशय

समंजस आणि निगर्वी स्वभावाच्या. त्यांचा प्रेमळ व शालीन स्वभाव असताना शेखरने हे असे का करावे?

मी त्यावेळी अतिशय संयम ठेवून विचारले,

‘‘हे काय आहे?’’

अतिशय शांत स्वरात त्याने सांगायला सुरुवात केली.

‘‘ती समोरच राहते. आम्ही इथे येवून एक वर्षही झाले नाही. मी तिच्याकडे पाहण्याचे बोलण्याचे टाळत होतो. एक दिवस तिने मला चहाला बोलावले.

तिचा पती माधव पण होता घरात. त्या पहिल्या भेटीत तिची आर्जवता मला मात्र अस्वस्थ करून गेली. त्यानंतर ती माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होती. थोडी जरी संधी मिळाली तरी हसण्याबरोबर काहीतरी लाजून बोलायची. एकदा मी तिला म्हटले सुद्धा, ‘‘हे असे बोलणे वागणे बरोबर नाही.’’

परंतु तो अबोलच.

मी ही कळत नकळत तिच्या ह्या मूक प्रेमाला निःशब्द होण्याला प्रतिसाद देऊ लागलो. यात मी कसा गुरफटलो ते कळलेच नाही. शेखर सांगत होता व मी ऐकत होतो.

‘‘मी कोणताच सकारात्मक प्रतिसाद न देता तिचे बोलणे व घरी येणे चालू झाले. कधीकधी सौ. असताना पण ती यायची.

मी एकटा असतानासुद्धा. पण असे वारंवार येण्याने व बोलण्याने आपोआप आमचा स्नेह वाढला. तिच्या मनात काय असावे याचा अंदाज सुरुवातीला आला नाही. कदाचित हे एकतर्फी प्रेम असावे.

'पण शेखर हे असे तेव्हाच थांबायला हवे होते. तिला स्पष्टपणे सांगायला हवे होते. मी धाडस करून त्याला म्हणालो.

'बरोबर आहे.'

"पण जास्ती जवळीक निर्माण झाल्यावर तिच्या या अबोल प्रेमाचा शाब्दिक स्वीकार करण्याशिवाय काय पर्याय होता?'' शेखर अगतिकपणे उद्गारला.

यानंतर या हितगुजपर बोलण्याचे रूपांतर स्पर्शात आपोआप झाले. ती आनंदित झाल्याचे मलाही जाणवू लागले. आज तुम्ही तिला पाहिले अशीही आमची फक्त दुसरीच भेट.

माझे हे त्यांच्याशी झालेले बोलणे फक्त १५-२० दिवसांपूर्वीचेच आणि त्यानंतर आजचा हा दुःखाचा दिवस उजाडला.

हे सगळे मला आठवले याचे कारण माझे मन त्यांचे पार्थिव पाहून सुन्न होऊन गेले. नंतर कळले याचे जबरदस्त दडपण त्यांच्यावर आले असावे. आपले कुटुंब आपली सामाजिक प्रतिष्ठा, कंपनीचे स्थान व पद याबाबत सरोदे खूपच भावनाशील तर झाले

नाही ना? त्यातच ते एकटे मोटारसायकलवर बाहेर पडले असावेत व रात्रीतून त्यांनी या जगाचा निरोप घेण्याचा निर्णय तर घेतला नाही ना? नंतर मला त्यांचे वडिलभाऊ भेटले व त्यांनी शेखरने लिहिलेली चिठ्ठी मला दाखवली. त्यात त्यांनी चुकीची कबुली व सर्वांची क्षमा मागितली होती.

प्रसंग छोटे असतात पण त्याची किती मोठी किंमत मोजावी लागते. सरोदे तुमचे हे एकतर्फी जाणे सगळ्यांना खटकले तसे मलाही. तुमचा व माझा स्नेह प्रत्यक्ष फक्त एक ते दीड वर्षांचाच पण आज असे वाटते आपले ऋणानुबंधाचे जन्मोजन्मीचे नाते आहे. एखादया छोटया अपराधाचे ओझे एवढे का बाळगलेस तू?

शेवटी त्या पार्थिव देहातील माझा शेखर मी कोठून शोधणार होतो?

\- - - - - - - - - - - - - -

# एका जप्तीची अशी ही गोष्ट

मी कोपरगाव व श्रीरामपूरला असताना जप्तीनिमित्त बऱ्याच वेळा बाहेर जात असे. सकाळीच निघावे लागत असे. मुद्दाम होऊन कधी शेतकऱ्याला त्रास दिल्याचे मला आठवत नाही. हरकल हे अधिकारी नेहमी बरोबर असत. बेलिफला बरोबर घेऊन जावे लागत असल्याने कारवाई किंवा थोडीफार वसुली करावीच लागत असे. अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात, आठवतात. सगळ्यांच्याच कथा करायच्या म्हटल्या तर तो एक स्वतंत्र संग्रह होईल; पण एक-दोन प्रसंग आवर्जून आठवतात. ते कितीही केले तरी स्मृतीपटलावरून जात नाहीत.

एका केसमध्ये आम्ही जप्तीचे सर्व मार्ग अनुसरले. आता शेवटी कर्जदार किंवा जामीनदार याला अटक करून एक-दोन दिवस तरी कैद केली तर त्याचा वसुलीवर काही परिणाम होतो का हे पहावयाचे ठरवले होते. तो प्रसंग खूपच मजेशीर घडला.

मी बेलिफ व व हरकल सकाळीच गोंधवणी गावात गेलो. खरे म्हणजे आम्हाला कर्जदाराला घेऊन कोर्टात हजर करावयाचे होते; पण झाले भलतेच. गावात ७.३० ते ८.०० च्या सुमारास पोहोचलो, तर कर्जदाराचे एक जामीनदार मंदिराकडे जाताना श्री. हरकल यांना

दिसले. झालं जीप थांबवली. बेलिफने त्याला नावाने हाका मारली व जीपकडे बोलावले. तो तर अनवाणीच चालला होता. त्याला जीपमध्ये बसवले. सगळ्यांनी आपण आता नगरच्या कोर्टात चाललोय तिथे तुम्ही जामीनदार या नात्याने कोर्टासमोर हजर राहायचे असे सांगितले. तो तर पूर्ण गर्भगळीत झाला होता. २ च्या आत अहमदनगर कोर्टात हजर होणे गरजेचे होते; कारण आज बोर्डावर ही केस होती. त्याला एक दिवसाची कस्टडी मागितली. त्यासाठीचा खर्च कोर्टात भरला. आम्ही त्याची सगळी सोय होईपर्यंत नगरला थांबलो. त्याला जेवण, अंथरूण, पाणी हे सगळे आम्हीच दिले व दुसऱ्या दिवशी दुपारी पुन्हा नगरला यायचे हे ठरवून रात्री श्रीरामपूरला परत आलो.

दुसऱ्या दिवशी २ ते २.५ च्या दरम्यान कोर्टात हजर झालो. श्री. राठी हे सीनियर कोर्टाचे जज्ज होते. त्यांच्यासमोर मी व जामीनदार हजर झालो. आता मी काहीच पैसे भरू शकत नाही असे त्याने सांगितले. मग राठी साहेबांनी त्याची जबानी नोंदवून घेतली व १० दिवसांची मुदत दिली वस्तू किंवा मूळ कर्जदाराने दाव्याच्या १०% रक्कम तरी या कोर्टात जमा करावी असा हुकूम दिला व ४ वाजण्याच्या सुमारास त्याची सुटका केली. पहा ज्यांना आम्ही अटक करून आणली त्याला कोर्टाने सशर्त सोडल्याने तो कुठे जाणार हा विचार मी व हरकलने केला व जज्ज साहेबांची रीतसर

परवानगी घेतली व त्या जामीनदाराला जीपमध्ये बसवून आम्ही श्रीरामपूरकडे निघालो. रात्रीचे ८ वाजले होते. त्याला त्याच्या गावी सोडणे गरजेचे होते; त्यामुळे त्याला गोंधवणीला त्याच्या घरापर्यंत सोडले व त्याचा निरोप घेऊन आम्ही दोघे आपापल्या घरी आलो.

दाव्याचा निकाल लागल्यानंतर जो हुकूम मिळत असे म्हणजे Decree. ती त्या हुकुमानुसार बजवावी लागत असे. श्रीरामपूर शाखेत असे २००० पेक्षा जास्त दावे निकाली लागले होते. त्यामुळे आमचा निम्मा वेळ या दाव्याच्या कामातच जात असे.

एकदा माळवडगाव या गावी २१ × ४३ चा हुकुम बसवायचा होता. आम्ही सकाळीच ९ च्या आत पोहोचलो. आमचा एक शिपाई पांडुरंग शिंदे याच गावचा. त्यामुळे कर्जदाराची माहिती व पत्ता मिळणे सोपे झाले होते. गावच्या वेशीजवळच पूर्वीच्या सरपंचाचे घर होते तिथे ५ मिनिट थांबलो. ते या प्रकरणातील कर्जदाराचे जामीनदार पण होते. जरूर पडली तर तुमची मदत लागेल असे हरकल यांनी त्यांना सांगितले व आम्ही ठोंबरे या शेतकऱ्याच्या घरी पोहोचलो. महादेव ठोंबरे व त्याची पत्नी बायजा दोघांना आमच्या जीपची चाहूल लागली होती. जे जप्तीचे समन्स आमच्याकडे होते ते कोर्टामार्फत त्यांना पण आलेले होते; त्यामुळे आम्ही तिघे पण जप्तीला आलो आहोत हे त्या शेतकऱ्याला नाही, पण त्याच्या बायजेला समजले.

पहा तिने काय केले! दाराच्या उंबरठयावर ठाण मांडून बसली. त्यामुळे आम्हाला आत जाता येऊ नये ही शक्कल लढवली. कारण घरातील मुद्देमालाची जप्ती करावी असा तो हुकूम होता. आता आम्ही तिघेही घराच्या अंगणात ठाण मांडून बसलो होतो. तिथून उठण्याचे नाव घेत नव्हती. आमच्या बरोबरच्या बेलिफने श्रीरामपूरहून महिला पोलीस कॉन्स्टेबलला बोलावून आणू का असे मला विचारले. मी म्हटले गरज नाही. हरकलने पण दुजोरा दिला. महादेव म्हणजे बायजेचा नवरा. आमचा कर्जदार. पहिल्या खोलीत येरझारा मारत होता, थकलेला होता. तो अंगावर पांढरा सदरा; पण मळलेला धोतर व काळी पुठयाची टोपी व पांढऱ्या मिशा. मधून मधून आमच्याकडे कुत्सित नजरेने पाहतो की काय असे वाटे; हरकल म्हटला २ तास झालाय ही म्हातारी काही जागची हलत नाही. जप्ती न करताच परत जावे लागेल की काय? असे तो म्हणू लागला.

आता दुपारचे १ वाजून गेले होते. ती पाच दहा मिनिट जरी उठून घरात गेली तरी आपण तिघे पण आत जायचे असे ठरवले. ती उठली होती. पण आम्ही उठलो म्हंटल्यावर दोनच मिनिटात परत उंबरठयावर ठाण मांडून बसली. आता मात्र ती दाराला टेकून बसली.

कधीतरी उठेलच ती. आपण पाच वाजेपर्यंत नियमाप्रमाणे थांबू व परिस्थितीचा अहवाल तयार करून नंतर निघू असे बेलिफला सुचवले त्यानेही संमती दिली. आम्ही निष्कारणच जिद्दीला पेटलो होतो की काय? एरवी थोडाफार वसूल करून किंवा मुदत द्या असा अर्ज लिहून घेऊन आम्ही नेहमीच प्रत्यक्ष जप्ती न करता बऱ्याच वेळा जात असू. पण आज मात्र हे अनपेक्षित समोर आले होते. आम्ही अगदी डोळयात तेल घालून महादेव व बायजेच्या हालचालीवर लक्ष देत होतो. तेवढयात बायजा उठल्याचे हरकलने पाहिले. ती आत गेली असावी. त्या २ ते ३ मिनिटाच्या अवधीत  बेलिफ आत गेला. कारण तो कोर्टाचा प्रतिनिधी होता. त्यानंतर हरकल व मी घरात शिरलो. एकदम हायसे वाटले. बायजा ओरडत बाहेर आली. माझ्या एकाही वस्तूला हात लावून देणार नाही म्हटली.

तिला व महादेवला मी समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्यांच्या मनात काहीतरी वेगळेच होते असे वाटू लागले. बेलिफने एक एक वस्तूचे लिखाण चालू केले. टेबलफॅन होता. एक भले मोठे जुने लोखंडी कपाट होते. अजून त्या घरात बऱ्याच जुन्या वस्तू होत्या. एक भिंतीवर घडयाळ पण बेलिफने खाली घेतले. हरकलने अजून चार ते पाच चांगल्या वस्तू पाहिल्या. सगळयांची

जुळवाजुळव केली. आता ते दोघेही शांत झाले होते. पंचनामा करावा लागणार होता.

आम्ही तिघे सह्या करणार होतो. पण अजून दोन जणांची जरुर होती. आम्ही नंदू ड्रायव्हरला हाक मारली. त्याच्याबरोबर एक जण गप्पा मारीत होता. तोच श्रीरामपूरला जाणाऱ्या एसटीची वाट पाहत होता. त्याला नंदू ड्रायव्हरने पंचनाम्याला तयार केले. श्रीरामपूरला घेऊन जाऊ हे आमिष त्याला पुरेसे होते. रीतसर पंचनामा बेलिफने लिहिला. आमच्या ५ जणांच्या सह्या घेतल्या. बायजा आता शांत झाली होती. तिच्या हुशारीची मी दाद दिली. तिलाही बरे वाटले.

पण आता हे सगळे सामान घेऊन कोर्टात जावे लागणार होते. तेवढयात बेलिफने एक युक्ती सुचवली. एखाद्याच्या जोखिमीवर मुद्देमाल कोर्टातर्फे आपण इथेच सुरक्षित ठेवू शकतो म्हटला. सगळ्या मुद्देमालाची किंमत रु. १५०० अंदाजे लिहिली. म्हणजे एवढी रक्कम भरली तरी सामान सोडवता येईल याची कल्पना त्यांना दिली. नंदूला हरकलने जुन्या सरपंचाच्या घरी पाठवले व तेथून काही वाहनाची व्यवस्था होते का पाहून ये म्हटले. नंदू गेला बऱ्याच वेळाने तो एका टेम्पोला घेऊन आला. जर तो सूर्यास्तानंतर आला असता तर केलेली जप्ती व्यर्थ ठरणार होती. रितशीर पंचनामा केला. साक्षीदार म्हणून कर्जदाराचीच सही हरकलने त्याला पटवून घेतली व हे सगळे सामान जामीनदाराकडे कोर्टातर्फे

रितशीर ठेवले म्हणजे आम्ही आधी ज्या पूर्वीच्या सरपंचाकडे थांबलो ते घर. त्यांच्याकडे चहा घेतला व श्रीरामपूरला निघालो.

आमची इच्छा नसताना केवळ त्यांच्या हट्टामुळे आम्हाला अशी जप्ती करावी लागली होती. एक आठवडा गेला पांडुरंग शिंदेने लोकमतचा अंक आणून आम्हाला दाखवला. त्यात तिसऱ्याच पानावर आमच्या ह्या जप्तीची सविस्तर बातमी आली होती. त्यात बातमीदाराने आमच्यावर बरीच टीका केली होती. मी प्रवचन करण्याच्या निमित्ताने माळवडगाव गावी जात होतो. एकीकडे प्रवचन करायचे व दुसरीकडे अशी जप्ती करायची. बँक मॅनेजर म्हणून माझा असाही उल्लेख या बातमीत केला गेला.

पूर्वीचे सरपंच व आमचा शिपाई पांडुरंग यांनी ठोंबरे कुटुंबाला समजावून सांगितले. पुढे यथावकाश कोर्टात त्यांनी रुपये १५०० भरल्यावर कोर्टाने माल सोडण्याचा रितशीर हुकुम केला.

मी अजूनही ही जप्ती आठवली की बायजेच्या त्या क्षणी दाखवलेल्या धैर्याचे व प्रसंग अवधानाचे कौतुकच करतो, जी गोष्ट आत्तापर्यंत एकाही कर्जदाराला सुचली नाही ती एका महिलेला कशी काय सुचावी हे मला अजूनही कोडेच आहे.

# चंद्रभागेची जिद्द

मी बॅंकेच्या निवृत्त अधिकाऱ्याच्या संघटनेच्या मिटिंगनिमित्त नासिकला गेलो होतो. त्या गोष्टीला ४ वर्षे झाली. जानेवारी २०१७ साल होते. मिटिंग झाल्यावर जुन्या पिंपळगाव बहुला म्हणजे आताच्या सातपूर एम.आय.डी.सी. मध्ये जाण्याचा योग तब्बल १८ वर्षांनी आला.

मी शाखेत पाऊल ठेवताच थोडा पुढे श्री. शिंगोटे या सहकाऱ्याकडे चालू लागलो. तितक्यात मला असेच उभे करून चंद्रभागा सामोरे आली. तिला इथे पाहून मी आश्चर्यचकित झालो. मला नमस्कार करायला ती वाकली खरी पण १-२ मिनिट निःशब्द स्तब्धतेत गेले. माझ्या पायावर तिचे नेत्राश्रू पडले होते. मी तिला हात तरी कसा लावणार तरी पण तिच्या खांदयावर एक हात ठेवून म्हटले हे तू काय करतेस? अगं, माझ्या पाया काय पडतेस? मी काय देवळातला देव आहे का?

तिच्या त्या तोडक्या मोडक्या मराठीत ती म्हटली “माझ्यासाठी तुम्हीच देव आहात साहेब''

सगळा स्टाफ हे दृश्य पाहत होता. मी पण ह्या घटनेने आवाक झालो. माझ्याकडे पण शब्द नव्हते. श्री. शिंगोटेंकडून कळले की, तिची इथे एम.आय.डी.सी. सिन्नर शाखेतून नुकतीच बदली झाली होती.

किती प्रसन्न व हसतमुख दिसत होती ती. गणवेषातील पांढरी शुभ्र साडी त्याची लाल रंगाची किनार व साडी पण स्वच्छ व इस्त्री केल्याने आटोपशीर व व्यवस्थित. तिनेच शिंगोटेंनी सांगितल्यावरून आम्हा सगळयांना शेजारच्या टपरीवरून आवर्जून कपात चहा आणला होता.

मी तिला म्हटले ‘‘चंद्रभागा ह्या चहाला तुझ्या हातच्या चहाची चव नाही बरं का’’ तिने स्मितहास्य केले व थोडी लाजली व अदबीने बाजूला झाली. साहेब लोकांच्या घोळक्यात शिपायाने कशाला थांबायचे असा तिने विचार केला असावा.

मुजुमदार व मला पुण्याला परत जायचे असल्याने आम्ही निघण्याची घाई केली तरी ५ वाजले होते. आम्ही पुण्याच्या दिशेने कारने प्रवास चालू केला. थोडा वेळ मिटिंगच्या गप्पा चौधरी व मुजुमदार यांनी मारल्या.

नासिकरोड सोडले व मी चंद्रभागेने नमस्कार केलेल्या या अचानक घटनेतून अजूनही सावरला नव्हतो.

मी १९९६-९७ ला सेवा शाखेत नासिकला असतानाची ही गोष्ट आहे. शाखेची झाडलोट व फर्निचर पुसण्याचे काम शंकर करीत असे. काम झाल्यावर एकादा तास तो थांबत असे. शंकरला दारूचे व्यसन होते. त्यामुळे तो बऱ्याच वेळा कामाला दांडी मारत असे.

ज्यावेळी त्याची दांडी असे त्यावेळी त्याचे काम त्याच्या बायकोला येऊन करावे लागे. चंद्रभागा काम करून शाखेच्याच शेजारी खरे कुटुंबाचे हॉटेल होते तिथे कामाला जात असे. शंकर इतका अजागळ, वेंधळा व कायम अस्वच्छ की त्याच्याशी बोलतांना पण अस्वस्थ होत असे. त्याउलट चंद्रभागा नेहमी साधीच साडी पण स्वच्छ धुतलेली असायची. नेहमी हसतमुख प्रसन्न. शंकरचे व्यसनाचे ओझे कुटुंबावर असूनही त्याचा जणू भारच नाही असे वरवर भासवण्याचा आटोकाट प्रयत्न करणारी. अशी दोन विरोधाभास असणारी जोडी नवरा बायको म्हणून एकत्र नांदत होती.

दुपारच्या चहापानाच्या सुट्टीत आम्ही सगळे म्हणजे मी कुलकर्णी /पागे/मोरे चहाला खरेंच्याच हॉटेलमध्ये जात असू. खरेंचे हॉटेल तसे लहानच होते. पण दुपारच्या सुट्टीत तिथे ३ ते ४ च्या दरम्यान गर्दी व्हायची. खरेंचे पूर्ण हॉटेल चंद्रभागाच सांभाळायची. खरेंची आई गल्ल्यावर असायची. खरे कधी कधी हॉटेलमध्ये

बसायचे. पण ते कायम एकतर हिशोब करीत किंवा ऑर्डर देऊन चंद्रभागेला सूचना देण्यापुरतेच त्यांचे काम. खरेंच्या हॉटेलची स्पेशालिटी म्हणजे मूगभजी. त्यासाठी शेजारची ऑफिसेस व बॅंक येथील स्टाफ हमखास फक्त ही भजी खायला येत असत. रेसिपी व कृती अर्थातच चंद्रभागेची. तिच्या हातात काय जादू होती हे मला शेवटपर्यंत उमगले नाही.

चहा पण चंद्रभागा चांगला मसालेदार करायची. एक दिवस जरी ती नसली तरी ओळखीचे गिऱ्हाईक फिरकत नसे. खरेंचे हॉटेलचा केंद्रबिंदू होती चंद्रभागा.

शालिमार चौकाच्या रॉयल हॉटेलच्या शेजारच्या बोळीत पत्र्यांच्या चाळीत ती राहत होती. एकदा १-२ दिवस शंकर पण आला नाही व ती पण साफ सफाईला आली नाही. मग मी गायकवाड शिपायाबरोबर तिच्या घरी गेलो. अर्थात बॅंकेचे कामकाज आटोपले होते. संध्याकाळची ५-६ ची वेळ असावी. गायकवाडने तिला हाक मारली. पत्र्याचाच दरवाजा होता. तिने तो उघडला. घरात तिच्या २ लहान मुली होत्या. त्यांना तिने बाहेर जायला सांगितले. मी म्हटले असू दे. त्या काय त्रास देणार आहेत. चंद्रभागेची तारांबळ झाली. लाकडाच्या तोडक्या मोडक्या खाटेवर शंकर झोपला होता. तो आजारी असल्याचे व बहुतेक न्युमोनिया झाल्याचे तिने सांगितले. तिथे आम्हा दोघांना बसायला शक्य

तितकी चांगली गोधडी टाकली होती. आम्ही दोघेही बसलो. तिला नाही म्हणत होतो. तरी तिने चहा ठेवलाच. घरात दूध नसावे याचा अंदाज आला. कारण ती बाहेर गेली व पावशेर दुधाची पिशवी घेऊन आली. मी तिला रागावलो सुद्धा. अगं, शंकर आजारी असताना तू हे चहाचे काय करत बसली? ती दवाखान्यात जाऊन आली होती. त्याचा खोकला व न्युमोनिया हा आता तिला नित्याचा झाला होता. एक दोन दिवसांत तो बरा होईल व आम्ही दोघेही कामावर येऊ. एवढे असूनही ती खरेंच्या हॉटेलवर २-३ तास कामावर जात असे. कारण तिने सुट्टी घेतली तर खरे त्या दिवसाचा पगार कापत असे. अशी कपात तिला कशी परवडणार होती? आमच्याकडे तर शंकर कायमस्वरुपी नव्हता. त्यामुळे हजेरी प्रमाणेच पैसे मिळत असत.

तशी ती वयाने लहान असावी त्यावेळी. पण तिच्या दोन मुलींना शिकवायचे मोठे करायचे व स्वतःच्या पायावर उभे करायचे हे स्वप्न ती पहात होती. मोलमजुरी ती करते, नवरा करतो पण मुलांच्या नशिबात ते यायला नको म्हणून त्यांच्या शाळेकडे तिचे लक्ष असे. हे सगळे सांगायचे कारण तिच्या घरी ५-१० मिनिटेच थांबलो पण तिच्या बोलण्यातून हे सगळे न विचारता आपोआप आले.

आपलं मन मोकळं करायला कोणीतरी मायेचे-प्रेमाचे हवे ना असे ती काकुळतीला येऊन म्हणाली. मी व गायकवाडने तिचा निरोप घेतला. ती पदराने डोळे पुसत रस्त्यापर्यंत आम्हाला सोडायला आली होती. शंकरची काळजी घे. औषधे व्यवस्थित दे. मी व गायकवाडने तिला बजावले.

मी नंतर गायकवाडला विचारले सुद्धा. खरेकडे तिला किती पगार असेल. सगळे काम ती करत होती तरीही तिचा पगार त्यावेळी फक्त १०० रु. रोज होता. शंकरचा बँकेचा पगार जवळजवळ तेवढाच. ६००० रुपयांत या चौघांचे कसे चालले असेल. ती मधून मधून आकस्मित खर्चाला खरेंकडून उचल घेत असे असे कळले. खरे ती देत असे कारण त्यामुळे ती त्यांच्या दावणीला बांधली जाईल अगदी घट्ट. हे हिशोबी व मतलबी खरे कुटुंबाने बरोबर ओळखले होते. त्यामुळे तिची नोकरी तिथे चालू राहण्यास मदत होणार होती. अचानक येणाऱ्या खर्चाला सामोरे जाण्यासाठी दुसरा पर्यायही नव्हता व मुली नगरपालिकेच्या शाळेत असल्याने त्यांच्या शाळेचा खर्च फक्त लागणारी पुस्तके वह्या व स्टेशनरीचा होता. तरीही चंद्रभागा मेटाकुटीला येत असे शाळा सुरू होण्याच्या वेळी.

मी बरेच दिवस याचा विचार करीत होतो. यावर उत्तर नव्हते व दुसरा पर्यायही नव्हता. शंकरचा रोजचा पगार वाढविणे

माझ्या हातात होते. मी तशी शिफारस करून रिजनल ऑफिसकडून त्याचा पगार दिवसाला वाढवून घेतला. त्यासाठी शंकर व चंद्रभागाकडून तसे लेखी लिहून घेतले. मजकूर अर्थात मीच लिहून दिला. टाईपही मीच करवून घेतले. त्यांना थोडासा दिलासा मिळाला याची जाणीव मला झाली.

पुढे काही दिवसांनी नासिकच्या काही शाखेंमध्ये शिपायांची कायम स्वरूपाची नेमणूक करायची असे क्षेत्रीय कार्यालयातील श्री. बोरकर यांच्याकडून कळले. माझे विचार चक्र चालू झाले. चंद्रभागा यासाठी वयात बसते का ती पात्र आहे का हे मी पडताळून पाहू लागलो. पण् अडचण दुसरीच होती. सर्व अर्ज व नावे रोजगार विनिमय केंद्राकडूनच आली पाहिजेत व एकूण जागेच्या ४ पट नावे त्या ऑफिसकडून मागविण्यात आली असे कार्मिक विभागाकडून चौकशीअंती समजले. म्हणजे चंद्रभागेला रोजगार विनिमय केंद्रात नाव नोंदविण्यास सांगावे लागेल. यावेळी मी व आर. व्ही. कुलकर्णी यांनी चंद्रभागेला शाखेत बोलावले.

या नवीन नेमणुकीची कल्पना तिला दिली व एका आठवडयात तू तिथे नाव नोंदवून ये असे सांगितले. सुरुवातीला तिला हे काहीच समजले नाही. खरेंची नोकरी सोडायची हे तिला न पटण्यासारखे होते. ते सहजासहजी सोडणार नाहीत असे ती

आम्हाला म्हणाली. ते नंतर पाहू असे म्हणून तिला त्या केंद्रात १-२ दिवसांत जायला सांगितले.

आमच्या सांगण्यावरून नासिकच्या रोजगार विनिमय केंद्रात ती जाऊन आली. त्यांनी सांगितलेली कागदपत्रे तिने १-२ दिवसांत गोळा केली. तिथे अर्जंट नाव नोंदवायला पैसे द्यावे लागतील म्हटली. शंकरचा महिन्याचा पगारातील काही दिवसांचा पगार आधीच देऊ असे करून तो प्रश्न मिटवला.

आता ती नाव नोंदवून आली होती. तिचे वय व पात्रता शिपाईच्या भरतीसाठी योग्य होते. त्या निकषात ती बसत होती. मला हायसे वाटले. बोरकर यांनी त्यांच्याकडून जी नावे येतील त्यात हिचे नाव आले तरच आपल्याला हिचा विचार करता येईल असे सांगितले.

अडथळ्याची शर्यत संपली नव्हती. तिने त्या केंद्रात २-३ हेलपाटे मारले होते त्यामुळे तिची तिथे तोंडओळख झाली होती. बॅंकेकडे नावे पाठवायची त्या विभागाकडे तिने चौकशी केली. एकूण २० जणांमध्ये तिचे नाव येणे आवश्यक होते. तिने तर ३-४ दिवसांपूर्वीच नाव नोंदविलेले. तिला संध्याकाळी आम्ही २-३ जण भेटलो व काही करून नाव यादीत येईल हे पहा. दुसऱ्या दिवशी खरेच्या हॉटेलमधून अर्धा दिवसाची सुट्टी घेऊन ती गेली. तिथल्या कर्मचाऱ्यांसाठी तर ही संधीच होती. त्यांनी जास्त रकमेची मागणी

केली पण तिला सांगितले असल्याने तिने ती कबूल करून दिली. आता अजून एक अडसर दूर झाला.

एक आठवडयानी श्री. बोरकर यांचा फोन आला. रोजगार विनिमय केंद्राकडून नावांची यादी मिळाली व चंद्रभागेचे नाव यात २० वे आहे सांगितले. आता मुलाखतीचा दिवस येणार होता.

तिला यासाठी काय विचारणार याचा अंदाज आम्ही घेतला व धीटपणे उत्तरे दे असे सांगितले. शिपायाचे काम मी माझे पती सुट्टीवर गेले की सेवा शाखेत करते व मला याची माहिती आहे. टपाल चिटकवणे, तिकिटे लावणे, पोस्टात रजिस्टर्ड करून पावती आणणे, चेक घ्यायला व दयायला दुसऱ्या शाखेत जाणे ही कामे मी करत असते हे विचारले नाही तरी सांगायचे हे ठरवले.

झाले एकदाचा मुलाखतीचा दिवस उजाडला. सकाळी ११ लाच ती शाखेत आली. माझ्यासह इतर सर्व स्टाफच्या पाया पडली व आम्ही तिला यात शुभेच्छा दिल्या. जणू एका दिव्यांतून ती जाणार होती. खरेंच्या हॉटेलच्या जाचातून, गुलामगिरीतून तिची सुटका होणार होती. दुपारी ४ वा. तिची रितशीर मुलाखत झाली. कार्मिक विभागाचे आधिकार होते व श्री. बोरकर पण पॅनेलवर होते. त्यामुळे मी तसा निर्धास्त होतो. निकालाला २-३ दिवस लागले.

शाखा चालू झाली होती. आज शंकरने सुगंधी स्प्रे मारला होता. वातावरण प्रसन्न होते. तितक्यात बॅंकेचे बंद पाकिट घेऊन पळत पळत उसासा टाकत चंद्रभागा आली. थेट माझ्याकडेच. साहेब पाकिट तुम्हीच उघडा म्हणाली. तिची शिपाई या पदासाठी नेमणूक झाली होती. पत्र वाचून दाखवले. तिला जुजबी मराठी वाचायला येत होते. तिनेही मोठया उत्सुकतेने ते कसेबसे वाचले.

ती थोडा वेळ बाहेर गेली. येताना तिने पेढे आणले होते. तिच्या डोळयांत आनंदाचे अश्रू आले होते. माझेही डोळे त्यावेळी नकळत पाणावलेच. श्री. कुलकर्णी व पागे व सर्व महिला कर्मचाऱ्यांना आनंद झाला. खरेच्या हॉटेलपेक्षा अडीचपट पगार होता. शिवाय कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा व इतर सवलती, ३ वर्षांतून एकदा फिरायला जायचे पैसे हे सगळे तिला अगदी नवीन होते.

खरेच्या आईने तिला तू शिपायाची नोकरी कशाला करतेस, तू एक स्त्री आहे, बॅंकेतली कामे तुला कशी जमतील वगैरे बरेच सांगून पाहिले पण चंद्रभागा थोडेच ऐकणार होती?

अजून एक छोटासा अडसर आलाच. तिची पहिली नेमणूक सिन्नर एम.आय.डी.सी. शाखेत झाली. रोज एसटीने जावे यावे लागेल, प्रवासाचा खर्च होईल व जायला अर्धा तास लागेल. हया सगळ्या संभाव्य अडचणी येणार होत्या. पण ती आता

जिद्दीला पेटली होती. ३००-४०० रु. भाडेखर्च होऊ दया म्हटली. मी रोज लवकर उठून डबा करून व सगळयांचा स्वयंपाक करून जाईन म्हटली. मलाही बरे वाटले.

तिथला स्टाफ माझ्या ओळखीचा होता. श्री. जोशी मॅनेजर होते व श्री. डोळे आधिकारी होते. त्यांना सांगितले की, सांभाळून घ्या. पण ही वेळच आली नाही. तिचा गोड स्वभाव, नम्रता व कामाबद्दल कधीही तक्रार नाही त्यामुळे ती तिथे लगेच रूळली.

असे एक तप तिथे काढले व १२ वर्षांनंतर ती पिंपळगाव बहुला म्हणजे सातपूर शाखेत बदली होऊन रूजू झाली. सगळ्या स्टाफची मने तिने जिंकली होती हे मला तिथे गेल्यावर लगेच कळले.

तिने मला केलेला नमस्कार व डोळयांतील आसवे पाहून मीही गहिवरून आलो होतो. मुजूमदार माझ्याशेजारीच कारमध्ये होता. बोलता बोलता आम्ही संगमनेर सोडले होते व चहासाठी थांबायचे ठरले होते. ड्रायव्हरने गाडी थांबवली व चंद्रभागेच्या जिद्दीला मनोमन सलाम करून मी धाब्यावरच्या चहाचा घोट घेऊ लागलो.

# आप्पा व ताई

आज जवळजवळ दोन वर्षांनी गावी गेलो होतो. मागच्या वर्षी करोनाच्या संकटामुळे उत्सवाला जाता आले नाही. त्यानिमित्त आमच्या समोरच असलेल्या शांतारामची भेट झाली. लहान असताना त्याच्या घरी अनेक वेळा जात असेल. त्याची आई जीजी मला श्रावणात पोथी वाचायला बोलवत असे शांताराम त्याने बांधलेल्या ओटयावर बसला होता. त्याची दोन्ही मुले त्याचे वडिलोपार्जित ज्वेलरीचे दुकान सांभाळत होते. शांतारामने त्याच्या शेजारची दोन घरे विकत घेऊन नूतनीकरण केले होते. पैकी एक घर माझ्या जीव:श्च कंठ:श्च बालपणीच्या मित्राच्या म्हणजे रमेशच्या आई-वडिलांचे होते. रमेश अकाली गेला. त्याचा थोरला बंधू भानू पण राहिला नाही. मधला मधुकर पण आता ८० वर्षांचा होता. पण तो पण गावी येत नसे. मी शांतारामला विचारले सुद्धा!

मधुकर आता कुठे असतो? तो पुण्याला स्थायिक झाला. पूर्वी नियमित उत्सवाला येत असे, पण आता मात्र त्याला येणे होत नाही म्हटला. आप्पा व ताई म्हणजे मधुकर व रमेश ते आई-वडील त्यांना जाऊन आता दोन दशके झाली होती.

गावी गेलो की मागच्या स्मृतीला उजाळा मिळतो. नकळत मनात व अंत:चक्षूपुढे त्या चलतचित्रपटाप्रमाणे तरळतात. शांतारामचा निरोप घेताना आप्पा, ताईची आठवण झाली. मी १९७१ पर्यंत कॉलेज होईपर्यंत गावीच राहत होतो. रमेश ओतूर जवळच्या मढ या गावी हायस्कूलवर क्लार्क म्हणून लागला होता. नंतर एका दुर्धर पोटाच्या आजाराने त्याच्यावर मात केली. मी वारी येथे शाखाप्रमुख असताना भानूचे पोस्टकार्ड आले होते. मी दौंडला जाऊन आलो होतो त्यावेळी.

पण आज आप्पा व ताईच्या आठवणी माझा पाठलाग करू लागल्या होत्या. रमेश मी व अशोक आम्ही बालपणीचे सवंगडी. एकत्र देव दर्शनाला जायचे. रोज घाटातील गणपतीपर्यंत फिरायला जायचे. हा आमचा नित्यक्रम कितीतरी वर्षे आम्ही जपला होता.

मी त्याच्या घरी एकदा तरी जायचोच. आप्पा शिवणकाम करीत होते. त्यांची एक जुनी Puff कंपनीची शिलाई मशीन होती. त्या मशिननी आप्पांची शेवटपर्यंत साथ दिली. चुकून ती बंद पडली तर त्या दिवशी आप्पांचे काम बंद व्हायचे. वयाच्या मानाने आप्पा खूप थकलेले वाटायचे. पांढरा सदरा धोतर व टोपी या त्यांच्या पेहरावात एकदाही अपवादाने सुद्धा बदल झालेला मला आठवत

नाही. भानू खाजगी किराणा दुकानात कामाला होता. मधुकर Forest खात्यात गार्ड होता. त्यामुळे आप्पांना शिलाई कामावरच अवलंबून राहावे लागे. रमेशचे शिक्षण त्याचा खर्च आप्पांनाच करावा लागत असे. बाकी दोन्ही मुले उत्सवासाठी सहकुटुंब यायची. २ दिवस रहायची. रमेशची एक बहीण कमल ती पुण्याला आळंदी गावात राहत होती. तिचीही परिस्थिती जेमतेमच.

एवढे असूनही आप्पांनी कधी तक्रार केली नाही. आयुष्याचा सकारात्मक विचार काय असतो हे आप्पांनी कधी वाचले किंवा ऐकले नाही; पण आचरणात मात्र पूर्णपणे आणले होते. रमेशने पण हे मनापासून आनंदाने स्वीकारले होते. तो तांब्यात विस्तव टाकून त्याचा हायस्कूलचा गणवेश इस्त्री करत असे. परिस्थितीशी जुळवून घ्यायचे धडे गिरवता त्याने अंगी बाणले होते.

ताई नेहमी प्रसन्न असायची. लुगडे जरी थिगळ लावलेले असले तरी नेहमी स्वच्छ असे. पावित्र्य व निर्मळता यापेक्षा वेगळी काय असू शकते? ताई काठाची चोळी घालत असे. तिचा आवाज मृदू होता. त्यांचे घर लहान होते. फक्त एक खण रुंद. पण तीन खोल्या सलग व नंतर वाडा होता. ताईने दोन झाडे लावली होती. एक कापसाचे व दुसरे डाळिंबाचे. त्या दोन्ही झाडांनी ताईवर किती प्रेम केले होते. कमीत कमी मी पहात होतो त्या ७-८ वर्षांत तरी

ताईवर ती रागवली नाहीत. कापसाची आलेली बोंडे पाहून ताईला आनंद व्हायचा. तिच्या दिव्याच्या वातीची सोय या कापसाच्या झाडानेच केली होती. डाळिंबे खूप लहान असत. त्याचे दाणे पण लहान पण गोड होते. एखादे डाळिंब पिकले की, मला व रमेशला ताईने हसत द्यावे.

ताईचा स्वयपाक लवकर होत असे. छोटीच मातीची चूल, पण ताई ती नेहमी पुसून स्वच्छ ठेवायची. स्वयंपाक घर किती छोटे. साधा रॉकेलचा स्टोव्ह यायला सुद्धा त्याने मुहूर्ताची वाट पाहिली होती की काय?

मला वाटते, आम्ही हायस्कूलला गेलो होतो तेव्हा ताईच्या घरी पितळी स्टोव्ह आला असावा. मधुकरने तो नवीन स्टोव्ह आणला होता, त्यादिवशी ताईचा आधीच प्रसन्न व टवटवीत असलेल्या चेहरा खुलून दिसला होता.

मी कधी १० वाजता सकाळी रमेशच्या घरी गेलो तर ताई म्हणायची. सुरेश, रमेश बरोबर बस जेवायला. हल्लीची मुले नकार देतात. पण मी ताईला नाही म्हटलो नाही. छोटी पितळीची ताटली त्यात तिने केलेली चुलीवरची लहान बाजरीची भाकरी व भाजी मी कितीतरी वेळा खाल्ली. चुलीच्या मंद अग्नीवर ताईची भाकरी पण ताईच्या स्वभावप्रमाणेच मऊ असायची. भाजीसाठी ताई दगडी

पाटावर मिरची व मसाला रोज वाटायची. आयुर्वेदात औषध निर्माण करताना भाव पडतात म्हणे, पण ताईच्या स्वयपाकात मोला महागाचे मसाले नसायचे. साधी लाल मिरचीचे वाटण असायचे. पण तिचे मन पूर्ण स्वयपाक करण्याकडे असल्याने तिची लसणाची चटणीसुद्धा किती चवदार लागायची. ताई आग्रहाने वाढायची त्या आग्रहात किती माया होती ह्याचे शब्दांकन मी कसे करू?

जेवण झालं की मी, रमेश अजून शेजारच्या त्याच्या बहिणी माडीवर खेळत असू. एवढी मस्ती व आवाज देऊन पण ताई कधी आमच्यावर रागावलेली आठवत नाही.

गावी असताना लहान असूनसुद्धा लवकर उठत असू. ताई भल्या पहाटे उठून अंगण झाडायची. सडा टाकायची. रांगोळी बहुतेक बेलपात्राची काढत असे. दिवाळीत मात्र याला अपवाद. ठिपक्याची रांगोळी काढत होती. मी रमेश आम्ही लांब जाऊन रांगोळीचे खडे छोटे दगड आणून ते बारीक केलेत. माझी आई व ताईसुद्धा ती रांगोळी वस्त्रगाळ करून वापरत होती. रमेश मधून मधून सुट्टीत दौंडला जायचा. मग मात्र मला करमत नसायचे. तरीही आप्पा ताईकडे मी चक्कर मारत असे.

ताईचे घर साधेच. न चुकता शेणाने ती सारवायची. रमेश व मला म्हणायची, एक तर माडीवर जा नाहीतर पूर्ण वाळेपर्यंत येऊ

नका घरात. हे पाहून मला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा अभंग आठवला-

राजास् जी महाली | सौख्ये कधी मिळाली ——ऽऽ |
ती कुणा सर्व प्राप्त झाली या झोपडीत माझ्या ||
भूमीवरी पडावे, ताऱ्याकडे पहावे,
प्रभुनाम नित्य गावे या झोपडीत माझ्या ||

सुख म्हणजे नेमके काय असते ह्याचा वस्तुपाठ म्हणजे ताईची घराची स्वच्छता होती. मागच्या वाडयाची भिंत २५-३० फूट लांब असेल व १५-१६ फूट उंच असेल. पण दर दिवाळीत ताई ती हमखास सारवायची. ताईला हा उत्साह कुठून यायचा? जगण्यात आनंद असतो हे पुस्तकी वाक्य तिने वाचलेच नव्हते. कारण आप्पा तरी चौथी पर्यंत शिकलेले होते पण ताई – –

ती म्हणायची, मी कशाला शिकायला पाहिजे? माझी पोरं शिकतात ना! ताई तशी खूप भोळी, पण धार्मिक होती देवळात हमखास दर्शनाला जायची.

तिच्या भिंतीला भिंत लागून आप्पाच्या भावाचे घर होते. ताईची जाऊबाई नेहमी गुस्स्यात असायची. तिची दोन मुले पुण्यात नोकरीला होती. वसंता व शरद. धाकटा मात्र शिकला नाही. मग

एका खाजगी पिठाच्या गिरणीत कामाला होता. मुले पुण्यात असल्याने ती नाही म्हटले तरी गर्विष्ठ झालेली दिसत होती.

चुकून सुट्टीत वसंतरावांची मुले गावी आली तर ती समवयस्क असल्याने आमच्याबरोबर खेळायची. ते पुण्यावरून बुद्धिबळ आणायचे, छोटा कॅरम आणायचे. त्या मुलांना मजा वाटायची. पण त्यांचे आई-वडील माझ्याकडे व रमेशकडे तुच्छतेने पाहत होती की काय, असे वाटायचे. आमच्याबरोबर खेळत असताना त्यांची आई हाक मारायची. ज्ञानाने माणूस शहाणा होतो म्हणजे नेमका काय होतो? त्या शहाणपणात माणुसकीचा गंध असतो की नाही, याची शंका यावी इतके त्यांचे वर्तन आम्हाला खटकत असे. आज मीही पुण्याला आलो तो लहानपणाचा बंडा माझ्याजवळच सिंहगड रोडला राहतो. एक भाऊ लंडनला स्थायिक झाला. त्याचे वडील ९० च्या आसपास आहेत मधून मधून सकाळी फिरायला जाताना भेटतात. मला त्यावेळी लहानपणाचे दिवस आठवतात. आमच्यापासून दूर ठेवण्याची ती वृत्ती पाहून आजही तिटकारा येतो.

माझी आई गेली त्यावेळी मी १३-१४ वर्षांचा होतो. मी हंबरडा फोडून सारखा रडत होतो. आईला सोडायलाच तयार

नव्हतो. त्यावेळी ताई घरी येऊन मला अक्षरशः कडेवर घेऊन तिच्या घरी गेली किती समजूत काढत होती माझी!

मला अजूनही चांगले आठवते, अशी माया लावणारी माणसे आता दुर्मिळ का व्हावीत? अवकाशातील माया संपली का? नातलग असून नाती सुद्धा शुष्क का व्हावीत?

आजच्यासारखे आमचे लहानपण असते तर आम्हालाही ताईची माया कुठून मिळाली असती?

ताई आप्पाची आठवण झाली की, मन आजही गतकाळात रममाण होते. तेवढाच मनाला प्रेमाचे तुषार अनुभवायला मिळतात.

शांतारामने आज मला बोलावले नसते तर आप्पा-ताईची आठवण जी मनाच्या कोपऱ्यात साठवली तिला बाहेर यायला वाट तरी कशी मिळाली असती?

सुखी व आनंदी जीवन जगायला पैसा लागतो, असे जर कोणी म्हणत असेल तर आप्पा ताई त्याला अपवाद आहेत, असे मी म्हणेन. त्यांनी कधीही पैसे कोणाकडे मागितले नाही की, चैनीची वस्तू घरात घेतली नाही, तरीही प्रत्येक क्षण ते आनंदाने जगले.

# आमचे दादा


कै. दत्तात्रय स. खेडकर (दादा)

आज आण्णाचे दोन मेसेज आले. आण्णा म्हणजे सौ. शोभनाचा भाऊ. ते दोन्ही मॅसेज दादांच्या बाबतीतले होते. माझ्या आयुष्यात दोन दादा आले एक शोभनाचे वडील; त्यांना सगळे दादाच म्हणतो व दुसरे माझे चुलते. त्यांना पण आम्ही दादाच म्हणत होतो. आण्णांनी पाठवलेल्या मॅसेजमध्ये दादा यांना आदर्श व्यापारी पुरस्कार मिळाल्याची एक जुनी बातमी पाठवली होती. आमच्या लग्नानंतर ३० वर्षे दादांचा सहवास आम्हाला लाभला होता. आम्ही ज्या ज्या वेळी मंचरला गेलो, त्यावेळी दादांनी केलेले स्वागत मी कसा विसरेन?

मंचरच्या दादांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ होता. किराणा दुकानात त्यांनी खूप कष्ट घेतले होते. अतिशय प्रामाणिकपणाने धंदा करणे हे त्यांचे वैशिष्टय होते. घरात कोणीही पाहुणा आला तर जेवणाचा आग्रह करीत. त्यांचा एक नित्यक्रम असे. सकाळी

लवकर उठून गार पाण्याने अंघोळ. नंतर व्यायाम व त्यानंतर आवरून विठ्ठल मंदिरात ज्ञानेश्वरी पारायणासाठी जाणे. त्यात त्यांनी खंड पडलेला मला आठवत नाही. आता सर्व ठोक व्यापारी मंचरला येतात. पूर्वी मात्र दादांना पुण्याला जाऊन ऑर्डर द्यावी लागत असे. आठवडयात एकदा तरी ते जात असत. त्यांची वेळ पण ठरलेली असे. चौंडेश्वरी मंदिरात सप्ताह असेल तर दादांची लगबग. कीर्तनकारांना घरी जेवायला बोलवणार! एकदा मला त्या सप्ताहात प्रवचन करायला दादांनी सांगितले होते.

त्यांच्याकडे एक जुना फिलिप्स छोटा ट्रान्झिस्टर असे. न चुकता दुपारच्या १:३० च्या मराठी बातम्या ते ऐकत असत. आम्ही सगळे सुट्टीत गेलो की दादा हमखास गोड घेऊन यायचे. दादांना गोड खूप आवडायचे. दादांनी त्यांच्या चारही मुलींची लग्ने खूप हौसेने लावली. त्यांची वृत्ती पूर्ण धार्मिक होती; त्यामुळे सहसा ते चिडत नसत. अर्थात दुकानातील उधारीमुळे गिऱ्हाइकांवर मात्र रागवत. ते धंद्यामुळे स्वाभाविक होते. दादांनी सर्वच नातवांवर खूप जीव लावला. त्यामुळे प्रसाद, ताई व योगेश या माझ्या तिन्ही मुलांना दादांची आजही आठवण होते.

माझी जिथे जिथे बदली झाली त्या त्या ठिकाणी दादा व सौ. शोभनाची आई आलेले आहेत. आल्यावर स्नान झाले की,

ज्ञानेश्वरी हमखास वाचत. मी ज्ञानेश्वरी रोज वाचतो हे त्यांना खूप आवडायचे. प्रसाद व ताईचे लग्न २००८ साली झाले पण दादा २००७ सालीच आमच्यातून निघून गेले व या लग्नाला नव्हते याची खंत मला अजूनही जाणवते.

एक साधे तितकेच निर्मळ जीवन दादा जगले. त्यांचे संस्काराचे भांडवल घेऊनच जयंत आता दुकानदारी सांभाळतो आहे. मला कधी कधी वाटते जयंत म्हणजे ज्याला आम्ही बाळू म्हणतो. तो दादा दुकानातच आहेत असे समजूनच दुकान चालवतो की काय? या आभासातच कृतज्ञता आहे. दादा ज्यादिवशी गेले त्यावेळी कोणालाही थोडासुद्धा त्रास न देता गेले. झोपेतच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्या वेळी मी सुरतला होतो. यायला मला ८-१० तास लागले. त्यामुळे त्यांचे अंत्यदर्शन ही मला लाभले नाही, ही हळहळ मला आजही अस्वस्थ करते.

आमचे दुसरे दादा माझे चुलते, पण वडिलांपेक्षा जास्त जीव लावला त्यांनी. मी आज जो आहे किंवा शिकलो घडलोय त्याचे



दादा - माझे चुलते

श्रेय दादांनाच. दादांवर पूर्ण कादंबरी होईल इतक्या आठवणी आज दाटून आल्यात.

मी ५-६ वर्षांचा होतो त्यावेळी गावात एक फोटोग्राफर आला होता. दादा त्यावेळी मराठी शाळेचे हेडमास्तर होते. गावी म्हणजे आमच्या आणे गावी. मी, केशव, बिरू म्हणजे दादांचा मुलगा व माझा मोठा भाऊ, एक मंत्र्यांच्या नातेवाईकांचा भाऊ. आमच्या चौघांचा फोटो दादांनी मराठी शाळेच्या ओटयावर बसून काढून घेतला होता. कितीतरी वर्षे आमच्या आण्याच्या ओसरीत तो होता. ज्या मंचरच्या भाऊचा उल्लेख मी केला तो पुढे कल्याणला गेला. पण लहानपणी त्याला पायाला खूप आजार झाला. त्यावेळी दादांनी रोज त्याचे पाय स्वच्छ औषधाने धुतलेले मला चांगले आठवते. एकदा गजानन (म्हणजे माझा धाकटा भाऊ) देवळात जोरात पडला होता. त्यावेळी त्याच्या कपाळातून खूप रक्त वाहत होते. दादांनी घाईघाईने येऊन त्याला कडेवर घेऊन घरी आणले. त्यावेळी गावात डॉक्टर नव्हते. दादांनी काताचे चूर्ण करून

त्याचा लेप लावला होता. आज त्या ठिकाणी ४-५ टाके तरी पडले असते व ८-१० दिवस हॉस्पिटलला ॲडमिट करावे लागले असते.

माझी आई ज्यावेळी बाळंतपणात गेली त्यावेळी मी सातवीत होतो पण दादांनी शेजारच्या गावी म्हणजे बेल्ह्याला जाऊन डॉक्टरला आणले होते. नाना म्हणजे वडील त्यावेळी बाहेरगावी गेले होते. मला लहानपणापासूनच दादांनी खूप खूप घडवले आहे. अगदी शाळेत जात नव्हतो तेव्हा ५ वर्षाचा असतानाच १५ ऑगस्टला शाळेत भाषण करायला सांगितले होते. दादा त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक होते. मी पहिलीत असताना त्यांनी मला स्टेजवर छोटे नाटक बसवून दिले होते.

तोंडी गणिते सांगायचे मला व खूप अवघड पण तरीही तोंडीच उत्तरे द्यायला लावायचे. आम्ही हायस्कूल स्कॉलरशिपला बसलो होतो. दादांनी त्यावेळी एक छोटे गजराचे घडयाळ आणले होते. आमचे ७ वीचे शिक्षक दादांना आदराने गुरुजी म्हणतात. कारण ते दादांचे विद्यार्थी होते. आम्ही ६ जण गुरुजी व दादा सगळे मिळून या परीक्षेसाठी पुण्याला गेलो होतो. दादांनी माझी तयारी करून घेतली होती हे वेगळे सांगायला नको. मी आईबरोबर कळंबला आजोळी गेलो होतो. आईच्या चुलत भावाच्या मुलाकडून ते पण शिक्षक होते. सकाळी ८ वाजताच अंबू अंबू म्हणून आईकडे आले

म्हटले, बघ तुझ्या मुलाचे नाव आले या वर्तमानपत्रात. आईला एवढे कुठे वाचता येत होते? मी पुणे जिल्ह्यात स्कॉलरशिपला पहिला आलो होतो. आई नेहमी म्हणायची माझी मुले एक दिवस खूप मोठे होतील. एकदा ती वडिलांना रागावून म्हटली होती.

‘‘शेणातले किडे काही शेणात राहत नाही ते पण बाहेर येतात’’ ती शिकली असती तर यापेक्षा चांगली उपमा तिने दिली असती. मी तिला पाटीवर तिचे नाव लिहायला व तेच वाचायला शिकवले होते. एकदा त्या वेळचे तालुका मास्तर श्री. पोटे व माझे आहेर गुरुजी हे रात्री घरी आले व आईला त्यावेळी लिहायला सांगितले. पाटीवर तिने तिचे नाव लिहिले. त्यावेळी तिला किती आनंद झाला होता.

मी खूप शिकावे असे दादांना वाटायचे. नेमकी घरची परिस्थिती जी खूप चांगली होती. आई गेल्यानंतर मात्र दुकान पूर्वीसारखे चालेनासे झाले होते. मला इंजिनिअर किंवा मेडिकलला घालायचे तर खर्च येईल असा विचार करुन दादांच्या एका धायबर नावाच्या नारायणगावच्या शिक्षक मित्राने मी कृषी महाविद्यालयात जावे असा सल्ला दादांना दिला. मी खूप नाराज झालो होतो. पण त्यावेळी काही समजायचे व करण्याचे माझे वय नव्हते.

दादाच मला घेऊन पुण्याला मुलाखतीसाठी घेऊन आले. नंतर प्रवेश मिळाल्यावर होस्टेलच्या प्रवेशापर्यंत प्रत्येक वेळी दादा माझ्यासोबत यायचे.

मी खूप लहान होतो; पण मला आठवते की, त्यावेळी आमच्या गावच्या म्हणजे श्री. रंगदास स्वामीच्या उत्सवाचा सगळा जमा खर्च दरवर्षी दादाच लिहीत असत.

मला ज्यावेळी बँकेत नोकरी लागली, त्यावेळी मी दादांना शर्टाला टेरिकॉटचे कापड आणले होते त्यावेळी दादा जे म्हणाले ते मला अजूनही आठवते. मी हरक कापड सदऱ्याला वापरतो. हे टेरिकॉटचे कापड कशाला आणले? इतकी वर्षे मी साधे हरक कापड वापरले तर आता काय टेरिकॉटचा सदरा शिवू काय? त्यानंतर मी कधीही टेरीकॉटचे कापड आणले नाही. आपल्या जीवनात काय शेवटपर्यंत करता येईल त्याप्रमाणे वागलेले बरे, ही दादांची साधी शिकवण होती.

दादा आम्ही लहान असताना आजारी पडलो तर आईबरोबर आम्हाला जुन्नरच्या भाटवडेकर डॉक्टरांकडे घेऊन येत. एक दिवस पूर्ण जात असे त्यावेळी ते काचेच्या बाटलीत त्यांनीच तयार केलेले औषधे देत असत.

दादांचे राहणे एकदम साधे. पांढरा सदरा, धोतर ते पण साधे. त्यांचा एकच कोट होता व तपकिरी रंगाची पुठ्ठ्याची टोपी, ती पण पुण्यातील सिटी पोस्टच्या जवळच्या एकाच दुकानात मिळत असे.

नंतर नंतर माझे जाणे कमी व्हायला लागले. दादांना मात्र खूप आठवण होत असे असे दुसऱ्याकडून समजायचे. प्रसाद, योगेश व ताई यांना घेऊन गेलो की, त्यांची ते खूप आस्थेने विचारपूस करत होते. जर मुलांना घेऊन गेलो नाही तर त्यांची आठवण काढायचे.

दादांनी कधी परिस्थितीबद्दल तक्रार केली नाही. स्वतः मुख्याध्यापक असून आमची चुलती मात्र शाळेत अजिबात गेलेली नव्हती. नंतर नंतरच्या बदलीत दादा एकटेच गेले आहेत.

दादा सेवानिवृत्त झाले व नंतर गावीच राहिले, त्यावेळी त्यांचे आवरले की गिताई पूर्ण म्हणत. ज्ञानेश्वरीचा अध्याय वाचत. मी ८वी-९वीत होतो. मी शेजारी बसत होतो. मीही गिताई वाचे. कधी कधी त्यांच्या बरोबर ज्ञानेश्वरीपण वाचत असे. आज ज्ञानेश्वरी वाचताना अर्थ थोडाफार समजायला लागलाय; पण हे बाळकडू दादांनी पाजले आहे हे आता उमगायला लागले. आमचे कपडे म्हणजे मी, थोरला भाऊ केशव व धाकटे २ भाऊ गजानन व शिवाजी यांचे कपडे आमच्या वडिलांनी क्वचितच शिवले असतील. माझा लहानपणीचा मित्र रमेश त्याचे वडील, आम्ही

त्यांना आप्पा म्हणत असू. दादा आम्हाला घेऊन आप्पाकडे कपडे शिवायला द्यायचे. अगदी गणवेशसुद्धा.

दादा आम्हाला गावावरून पार्लेची बिस्किटे आणायचे. त्यावेळी त्यावर गाईचे चित्र असे. पण एकावेळी एकच बिस्किट देऊन पुडा परत ट्रंकमध्ये ठेवून त्याला कुलुप लावत.

दिवाळीत सुद्धा फटाके आणले की, सगळ्या भावांचे सारखे वाटे करून द्यायचे. आज हे सगळे आठवले की, वाटते किती साचेबंद जीवन होते ते! तरीही त्यात मजा होतीच ती अनुभवली. नाना म्हणजे वडील कामानिमित्त नागपूर किंवा तळेगावला जात व तेही खाऊ आणत. पण दादांची पद्धत वेगळी होती. दिवाळीला दादा लक्ष्मीपूजन करत. आम्ही सगळेच ते पाहात असू. त्यामुळे ती पूजा आम्हीही शिकलो.

एकदा मी १०-११ वर्षाचा होतो त्या वेळचा प्रसंग खूप गमतीशीर आहे. दादा ९ वाजताच्या तळेगाव गाडीने अळकुटीला म्हणजे बहिणीच्या गावी गेले होते. बहिणीला मुलगा झाला होता म्हणून बाळंतविडा घेऊन जायचा म्हणून ते गेले. मी बाहेर होतो. मी घरी आलो तर आईने दादा आताच ९ च्या एसटीने अळकुटीला गेल्याचे सांगितले. दादा मला कसे घेऊन गेले नाही? मी कसलाच विचार केला नाही. तसाच स्टॅन्डवर गेलो. एसटी २-३ मिनिटापूर्वीच

गेली होती. आजकाल ४-५ वर्षाच्या मुला-मुलींना सुद्धा चपला-शूज असतात. त्यावेळी आम्ही हायस्कूलला सुद्धा अनवाणी जात होतो. त्यामुळे आता काय करावे? एसटी आताच गेली होती. अळकुटीला जायला बेल्ह्याहून दुसरी पारनेरची बस असायची एवढे जुजबी ज्ञान होते. मी अक्षरशः बेल्ह्याला पळत पळत सुटलो. माझ्याकडे घडयाळ नव्हते. त्यामुळे किती वाजता पोहोचलो हे कळले नाही. अंतर ५ मैल होते. दादा नुकतेच भास्करशेठच्या टपरीत बसलेले होते. भास्करशेठ शिलाईचे काम करत होते त्यावेळी मी बेल्ह्याला खूप पळत आलो व दादा कॉर्नरवरच दिसले. मला खूप बरे वाटले. भास्करशेठ म्हणजे माझ्या जीव:श्च कंठ:श्च मित्राचे अशोकचे थोरले बंधू. एवढा पळत पळत का आला सुरेश? भास्करशेठने मला विचारले. मी म्हटले, मलापण अळकुटीला यायचे होते. मी उद्या तुला घेऊन आलो असतो एसटीने. तुला माहित आहे ना मी रोज सकाळी येतो.

मला काय उत्तर द्यावे समजेना दादा मात्र काहीही बोलले नाहीत की रागवले नाहीत. मला एक पायजमाचे व शर्टाचे कापड घ्यायला शेजारच्या एका दुकानात गेले. मी भास्करशेठच्या टपरीवर होतो. दादा पांढरे हरकचे कापड घेऊन आले. माझे माप घ्यायला भास्करशेठला सांगितले.

अळकुटीची बस दुपारी १ वाजता होती. अजून ३ तास होते. भास्करशेठने माझे माप घेतले व दुसरे काम बाजूला ठेवून माझा सदरा व पायजमा शिवायला घेतला. आम्ही ३ च्या पारनेर एसटीने अळकुटीला गेलो. दादांनी सगळा किस्सा बाईला सांगितला त्यावेळी नंदूचा जन्म होऊन आठ-दहा दिवस झाले होते. मला पाय धुऊन यायला सांगितले व माझ्या मांडीवर बाळाला मोठया कौतुकाने दिले. भार गेला शीण गेला, अवघा झाला आनंद ही त्यावेळची झालेली माझी अवस्था होती. आज नंदू ६० वर्षाचा झालाय. त्यालाही मामाचा हा किस्सा कदाचित माहीतही नसेल, पण तो मामाला विसरला नाही हे नक्की. याचे कारण तो ८-१० दिवसांचा मांडीवर झालेला माझा तो स्पर्शही असेल!

दादांनी काय नाही केले माझ्या लग्नाचे वेळी? दादांचे वय ७५ होते पण दादांचा उत्सव तरुणाला लाजवणारा होता. अगदी लग्न ठरल्यापासून ते होईपर्यंतचा. दादांनीच सारे पाहिले. मी दादांना काही पैसे आधीच दिले होते पण त्या सगळया पैशाचा पै-पै हिशोब दादांनी लिहून ठेवला होता. दादांना म्हटले दादा हे कशाला देता मला? म्हटले, लग्नाचा खर्च किती झाला आहे हे कळावे म्हणून. मी काय बोलणार? मी आयुष्यात असा हिशोब कधी केला नाही. पण दादांच्या स्वभावात ते बसत नव्हते.

पुढे गजाननचे लग्न ठरले. मी त्यावेळी चंद्रपूरला होतो. दादा आता ८० वर्षांचे झाले होते. पण सगळी व्यवस्था त्यांनीच पाहिली आहे. आहेरासाठी कपडे दादांनी विजयच्या वडिलांकडे म्हणजे ढुमणेकडे घेतले व त्याचे बिल मला द्यायला सांगितले होते. दादांना पेन्शन मिळत असे. पण ते उदार हाताने खर्च करत. मग तो घरात असो की, नातवांसाठी असो.

आमची एका आत्या होती. मंचरची. ती दादाला रघुनाथ म्हणायची. तिचा दादावर खूप जीव होता. दादांनी पण तिला व नंतर शेटे कुटुंबाला खूप जीव लावला. दादांच्या दोन्ही मुली व एक मुलगा यापैकी दादा फक्त ढुमणे यांच्या घरी बेल्ह्याला खूप वर्षे राहिले. पण तिथे त्यांनी त्याचा कापड दुकानाचा सर्व जमाखर्च लिहिला.

मी कॉलेजला दुसऱ्या वर्षाला असताना दिवाळीच्या सुट्टीत गावी घरी गेलो होतो. माझी तब्येत बिघडली होती. त्यावेळी गावी पिरजादे म्हणून जुन्नरचे डॉक्टर होते. माझा ताप उतरत नव्हता व जेवणपण जात नव्हते. दादा मला घेऊन पिरजादे डॉक्टर यांच्याकडे गेले. ते आमच्या घराशेजारीच राहत होते. त्यांनी माझे टॉन्सिलचे ऑपरेशन करण्यास सांगितले व पुण्याला घोले पाटील रोडवरील जोशी डॉक्टरांचा पत्ता दिला. माझे कॉलेज बुडू नये म्हणून दादा २-

३ दिवसांनीच मला घेऊन पुण्याला त्यांच्या शफी गुरुजी नावाच्या जुन्या मित्राकडे आले. ते रविवार पेठेत राहत होते. मुसलमान-हिंदू हा भेद तेव्हा नव्हताच! दुसऱ्या दिवशी दादा शफी गुरुजी व मी हॉस्पिटलला आलो. डॉक्टरांनी लगेच दुसऱ्या दिवशी ऑपरेशन करू सांगितले. दादा माझे सर्वच होते आईपण, वडीलपण. त्यामुळे २ दिवस माझ्याबरोबर हॉस्पिटलला थांबले. ३-४ दिवस शफी गुरुजींनी केलेला आमचा पाहुणचार मला अजूनही चांगला आठवतोय.

दादा माझ्यासाठीच झटले असे नाही तर विजयकुमार हा बाईचा मुलगा म्हणजे दादांचा नातू याला सैनिकी शाळेत घालायचे ही त्याच्या वडिलांची खूप इच्छा होती. दादा स्वतः आधी साताऱ्याला जाऊन चौकशी करून आले व नंतर विजयला घेऊन अॅडमिशन पण घेतले. दादा जसे माझ्याकडे कॉलेजला हॉस्टेलवर यायचे तसे ते साताऱ्याला पण जात. मला कॉलेजला २ वेळचा डबा पाठवावा लागत असे. सकाळी ६ ला एसटी असे व दुपारी १:३० ला दोन्ही वेळा दादा घरून एसटी स्टँडला डबा घेऊन जात. कधीकधी नानांना सांगत.

निवृत्तीनंतर जवळजवळ ४५-४६ वर्षे दादा जगले. आम्ही नोकरीनिमित्त बाहेर असल्याने दादांच्या भेटीसाठीच फक्त गावी

जात होतो. त्यानंतर माझे गावी जाणे आता फक्त उत्सवाला म्हणजे वर्षातून एकदाच. दादा १०० वर्षे जगावे असे मला वाटे पण तरीही ते ९७ वर्षांपर्यंत सुखा-समाधानाने जगले.

विजयादशमीची पूजा दादा खूप छान मांडत. आमचा व्यवसाय विणकामाचा होता. जुने मागाचे साहित्य (हातमागाचे) होते. त्याची पूजा दादा आमच्याकडून करून घेत. दादांनीच आम्हाला पाटीवर पेन्सिलने सरस्वती काढायला शिकवले. आज ती नातीला किंवा नातवाला मी काढून देतो, त्यावेळी कधीकधी दादांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

एकदा मी पुण्याहून बदली झालेली असताना नासिकच्या घरी आलो होतो. रविवारचा दिवस होता विजय कुमारचा बेल्ह्याहून फोन आला. त्यावेळी मी नुकताच नासिकला फोन घेतला होता. बाबा गेलेत म्हटला. लवकर ये मामा. त्यावेळी माझ्याकडे कार नव्हती; त्यामुळे एसटी शिवाय पर्याय नव्हता. आम्ही दोघे प्रसाद, ताई, योगेश सगळेच निघालो. मंचरचे दादा त्यावेळी आमच्या आधीच पोहोचले होते. सगळे माझीच वाट पहात होते. दादांचे अंत्यदर्शन व अंत्यसंस्कार करण्याचे भाग्य मला मिळाले होते. मी खूप भाग्यवान ठरलो होतो.

दादा तुम्ही आज हयात नसला तरी तुमचे विचार, तुमचे माझ्यावर केलेले संस्कार अजून जिवंतच आहेत. ते माझ्या देहाने कधीतरी संपुष्टात येतीलच, पण माझ्या मुलांमध्ये प्रसाद, माधवी व योगेशमध्ये जे संस्कार आम्ही दोघांनी म्हणजे शोभनाने व मी केलेत त्यात या दोन्ही दादांच्या संस्कारांचे बीज आहे.


या कथासंग्रहात दादांबद्दलच्या भावना लिहिल्या नाहीत तर ती कृतघ्नता ठरेल म्हणून हा लेखन प्रपंच! मनाच्या कोपऱ्यातून एक कप्पा रिकामा झाला ह्याची जागा दुसऱ्या आठवणींनी कदाचित भरूनही निघेल; पण हृदयाच्या प्रेमाच्या कप्प्यात जी पोकळी झाली ती कशी भरणार? त्याला दादांसारखेच नि:स्वार्थी प्रेम मिळायला हवे! हृदयाला प्रेमाला ओलावा असतो, करूणा असते, दया असते तो कप्पा हे लिहून थोडाफार रिकामा झाल्याचा भास होतो आहे, यापेक्षा जास्त लिहिले तर तो पूर्णपणे रिकामा तर होणार नाही ना या भीतीने धस्स झाले मला. म्हणून थांबतो. तुकोबारायांच्या अभंगवाणीचा संदर्भ घ्यायचा तर व सांगायचे तर –

ऐसी कळवळ्याची जाती | करी लाभा विण प्रीती ||

- - - - - - - - - - - - - - - - - - -

सुरेश पंदारे यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक.

फ़क्त एक क्लिक करा. उघडेल.



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे दुसरे पुस्तक.**

सुरेश पंदारे एका मोठ्या बॅंकेत चीफ़ मॅनेजर होते. जीवनावर भरभरून प्रेम करने आणि संवेदनशीलता या दोन गोष्टींमुळे ते इतर लोकांहून वेगळे झाले. त्यांनी त्यांचे अनुभव केवळ एक अधिकारी म्हणून न घेता एक माणूस या नात्याने घेतले. जे आताच्या काळात दुर्लभ झाले आहे. लहान शेतकऱ्यांना कर्ज देताना उपकारभावना नठेवता कर्तव्य पुर्ती म्हणून करणारे सुरेशजी जेव्हा आपले साधे साधे अनुभव शब्दबद्ध करतात तेव्हा त्यातली मानवतेची ऊब एखाद्या गोधडीसारखी आपल्याला सुख देते. मानवतेवरचा विश्वास टिकवते. त्यांच्या कथा शुद्ध मानवी संवेद आहेत. साध्या शब्दांत खुप मोठे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या. काळजाला भिडणाऱ्या.

सुरेश पंदारे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ.

वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३), सुरेश पंदारे (२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।